सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १४८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. ५ जुलै २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# हिंदी सक्ती ही मुंबई स्वतंत्र करण्याची चाचपणी - राज ठाकरे

## मराठी एकजुटीवर २० वर्षांनंतर उद्धव-राज एकाच मंचावर

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.५मुंबई**

राज्यात पहिलीच्या इयत्तेपासून हिंदी भाषेची सक्ती आणि त्रिभाषा सूत्र लागू करण्याचे दोन्ही शासकीय आदेश रद्द करण्यात आले आहेत. महायुती सरकारने घेतलेल्या निर्णयानंतर जल्लोष करण्यासाठी शिवसेना (ठाकरे) व मनसेच्या वतीने आज (५ जुलै) विजयी मेळाव्याचं आयोजन करण्यात आले आहे. वरळीतील (मुंबई) एनएससीआय डोम येथील या मेळाव्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली. राज्यात हिंदी सक्ती करण्याचा प्रयत्न हा मुंबई वेगळी करण्याच्या दृष्टीने टाकलेले पाऊल होते, असे राज ठाकरे म्हणाले आहेत. या निर्मयाच्या माध्यमातून त्यांनी हा विषय चाचपडून पाहिला असे राज ठाकरे म्हणाले.

सत्ताधाऱ्यांना नेमकं काय आणि कोणासाठी करायचं आहे? असा सवाल राज ठाकरे यांनी उपस्थित केला. राज ठाकरे म्हणाले की, हिंदी भाषा ही दोनशे वर्षांपूर्वीची भाषा आहे, महाराजांच्या काळात देखील नव्हती. कशासाठी आणि कोणासाठी आणि नेमकं काय करायचं आहे? यांनी फक्त चाचपडून पाहिलं. मुंबई स्वातंत्र्य करता येते का याच्यासाठी अगोदर थोड्स भाषेला डिवचून बघू, महाराष्ट्र शांत राहिला तर पुढे ते पाऊल टाकू.




कोणाची माय व्यालीय त्यांनी महाराष्ट्रला, मुंबईला हात घालून दाखववावा. काय मजाक वाटला काय? आम्ही शांत आहोत याचा अर्थ आम्ही गां** आहोत असा नाही होत.

राज्य सरकारने हिंदी सक्तीच्या निर्णय घेतल्यानंतर त्याला शिवसेना (ठाकरे) आणि मनसे या पक्षांनी कडाडून विरोध केला. यावेळी ठाकरेंची मुले देखील इंग्रजी शाळेत शिकली आहेत, असा युक्तीवाद करण्यात आला. यावर देखील राज ठाकरे यांनी भाष्य केले.



मग आता माघार घेतली त्याचं काय करायचं? मग सगळं प्रकरण वेगळीकडे वळवा. वेगळ्या ठिकाणी म्हणजे कुठे? तर ठाकरेंची मुले इंग्रजी माध्यमांमध्ये शिकली म्हणजे दादा भुसे मराठी माध्यमात शिकून शिक्षणमंत्री झाले. देवेंद्र फडणवीस इंग्रजी माध्यमात शिकून मुख्यमंत्री झाले. कोण कुठे शिकलं याचा काय संबंध? कोणाकोणाची मुले परदेशात शिकत आहेत याच्या याद्या आमच्याकडे आहेत. त्याचं तुम्ही काय करणार आहात? त्यापेक्षा मंत्रिमंडळातील एका-एका मंत्र्याचं हिंदी ऐका, फेफरं येईल. हे असले प्रश्न महाराष्ट्रातच विचारले जातात, असे प्रत्युत्तर राज ठाकरे यांनी दिले.

### 'हे' राजकीय नेते होते उपस्थित

या विजयी मेळाव्याला राज्यातील विविध राजकीय पक्षांचे नेतेही मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)च्या खासदार सुप्रिया सुळे, रासपचे महादेव जानकर, राष्ट्रवादीचे जितेंद्र आव्हाड, रिपब्लिकन पार्टीचे सचिन खरात, शेतकरी कामगार पक्षाचे जयंत पाटील, प्रकाश रेड्डी यांच्यासह अनेक नेते व्यासपीठावर उपस्थित होते. या एकत्रित उपस्थितीमुळे राज्याच्या राजकारणात नवा बदल घडण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.या विजयी मेळाव्यानंतर ठाकरे कुटुंबांनी एकत्र येत फोटो काढले.









## उद्धव ठाकरेंचा देवेंद्र फडणवीसांना टोला आमच्यातला आंतरपाट अनाजीपंतांनी दूर केला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५मुंबई**

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी आज वरळीमध्ये विजयी मेळावा घेतला. या मेळाव्याच्या सुरुवातीलाच उद्धव ठाकरेंनी युतीचे संकेत तर दिलेच, शिवाय देवेंद्र फडणवीस यांचा उल्लेख अनाजीपंत असा केला आहे. त्यामुळे आता या टीकेला देवेंद्र फडणवीस काही उत्तर देणार का? हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.




बऱ्याच दिवसांनी राज आणि माझी भेट अशी मंचावरती झाली आहे. आता पंचाईत अशी आहे की त्यांनी मला सन्मानीय उद्धव ठाकरे असं म्हटलं आहे. साहजिकच आहे त्याचं कर्तृत्व आपण सगळ्यांनी पाहिलं. माझ्या भाषणाची सुरुवात करताना सन्मानीय राज ठाकरे अशीच मी करेन. राजने इथल्या कार्यक्रमाची मांडणी राजने केली आहे. आजच्या कार्यक्रमाची घोषणा झाल्यानंतर सगळ्यांचं लक्ष आमच्या भाषणांकडे आहे. पण आमच्या भाषणांपेक्षा आमचं एकत्र दिसणं महत्त्वाचं आहे. आमच्यात जो काही आंतरपाट होता तो अनाजीपंतांनी दूर केला. असा टोला उद्धव ठाकरेंनी देवेंद्र फडणवीस यांना लगावला.

उद्धव ठाकरे म्हणाले, आमच्यातला आंतरपाट अनाजीपंतांनी दूर केला. आता अक्षता टाकण्याची काही अपेक्षा नाही. एकत्र आलो आहोत एकत्र राहण्यासाठी. मला कल्पना आहे की अनेक बुवा, महाराज हे बिझी आहेत. कुणी लिंबं कापतंय, कुणी गावी जाऊन अंगारे धुपारे करत असतील, रेडे कापत असतील. त्यांना सगळ्यांना सांगतो आहे या सगळ्या विरोधात आमच्या आजोबांनी लढा दिला होता. त्यांचे वारसदार म्हणून आम्ही तुमच्यासमोर उभे आहोत. भाषेवरचा विषय जेव्हा निघतो तेव्हा तो केवळ वरवरचा धरुन चालणार नाही. मधल्या काळात आम्ही दोघांनी या नतद्रष्टांचा अनुभव घेतला आहे. वापरायचं आणि फेकून द्यायचं. आता आम्ही दोघं मिळून तुम्हाला फेकून देणार आहोत. शिवसेना प्रमुख नसते तर तुम्हाला कुणी ओळखत नव्हता का? राजने सगळ्यांची शाळा काढली पण मला विचारायचं आहे मोदींची शाळा कुठली? भाजपा ही अफवांची फॅक्टरी आहे. उद्धव ठाकरेंनी हिंदुत्व सोडलं वगैरे सुरु केलं होतं. आम्ही तुमच्याही पेक्षा जास्त कडवट मराठी बोलणारे देशाभिमानी हिंदू आहोत. १९९२ आणि १९९३ मध्ये जे काही घडलं तेव्हा मराठी माणसांना शिवसेना प्रमुखांनी वाचवलं आहे, असंही उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे.

## श्रेय मला दिल्याबद्दल आभार; राज - उद्धव ठाकरेंच्या टीकेला फडणवीसांचे उत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५पंढरपूर**

जे बाळासाहेबांनाही जमलं नाही, जे अनेकांना जमलं नाही, आम्हा दोघांना एकत्र आणण्याचं ते देवेंद्र फडणवीस यांना जमलं असे राज ठाकरे म्हटलं, त्यावरती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. यावेळी बोलताना फडणवीस म्हणाले, मी राज ठाकरे यांचे आभार मानतो, त्यांच्या एकत्रित येण्याचं श्रेय त्यांनी मला दिलं आहे.





मी राज ठाकरे यांच्या आभार मानतो. त्यांनी दोन्ही बंधू एकत्र येण्याचे श्रेय त्यांनी मला दिले. त्यामुळे बाळासाहेब ठाकरे यांचे आशीर्वाद मलाच मिळत असतील. पण मला असं सांगण्यात आलं होतं विजय मेळावा होणार आहे, पण त्या ठिकाणी भाषण रुदाली देखील झालं आणि मराठी बद्दल एक शब्द न बोलता, केवळ आमचं सरकार गेलं, आमचं सरकार पडलं, आम्हाला सरकारमध्ये द्या. आम्हाला निवडून द्या. हा मराठीचा विजय उत्सव नव्हता. ही रूदाली होती, त्याचं दर्शन दिसून आलं आहे. मुळात २५ वर्ष महानगरपालिका त्यांच्याकडे असताना दाखवण्या लायक ते येथे काहीच काम करू शकले नाहीत. पण पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली आम्ही ज्या प्रकारे मुंबईचा चेहरा मोहरा बदलला, त्यांच्या काळामध्ये मराठी माणूस मुंबईमधून हद्दपार झाला. आम्ही बीडीडी चाळीतल्या मराठी माणसाला पत्रा चाळीतील मराठी माणसाला, अभ्युदय नगरच्या मराठी माणसाला स्वतःच्या हक्काचे घर त्याच ठिकाणी दिलं, त्याची असूया त्यांच्या मनामध्ये आहे. पण मी नेहमी सांगतो पब्लिक सब जानती है. त्यामुळे मुंबईतला मराठी असो किंवा मराठी सगळेच आमच्या सोबत आहेत. आम्ही मराठी आहोत. आम्हाला मराठी असल्याचा अभिमान आहे. मराठी भाषेचा अभिमान आहे. त्याचवेळी आम्ही हिंदू आहोत. आम्हाला हिंदुत्वाचा अभिमान आहे आणि आमचे हिंदुत्व हे सगळ्यांना सोबत घेऊन चालणारे हिंदुत्व आहे, असेही पुढे देवेंद्र फडणवीस यांनी म्हंटल आहे.

## 'मराठी बोलणार नाही' म्हणणाऱ्या केडियांना अखेर उपरती, मागितली माफी..

**विदर्भ प्रजसत्ताक दि.५मुंबई**

मुंबईतील व्यावसायिक सुशील केडिया यांनी सोशल मीडियावर नुकतीच एक पोस्ट शेअर केली होती. त्या पोस्टमध्ये मनसे अध्यक्ष राज ठाकरेंना आव्हान देण्यात आलं होतं. तसेच काही वृत्तवाहिन्यांना प्रतिक्रिया देत मराठी येत नसल्याचं सांगत आपण मराठी शिकणार नसल्याच्या संदर्भात केडिया यांनी विधान केलं होतं. एवढंच नाही तर राज ठाकरे व एक दहशतवादी यांच्या धोरणात काय फरक आहे? असा थेट सवाल सुशील केडिया यांनी उपस्थित केला होता. त्यामुळे सुशील केडिया यांच्या विरोधात मनसेच्या नेत्यांनी आक्रमक भूमिका घेतली होती.




यानंतर सुशील केडिया यांचं कार्यालय मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी फोडल्याची माहिती देखील समोर आली होती. मात्र, यानंतर अखेर सुशील केडिया यांनी माफी मागितली आहे. 'मी माझ्या चुकीबद्दल माफी मागतो', असं म्हणत केडिया यांनी एक्सवर व्हिडीओ पोस्ट करत माफी मागितली आहे. त्यांनी म्हटलं आहे की, 'राज ठाकरे यांच्याबद्दल मला नेहमीच आदर, कृतज्ञता वाटत आली आहे. मी माझी चूक मी स्विकारतो. तसेच मी आता अपेक्षा करतो की वातावरण शांत करावं, मी त्यांचा आभारी आहे', असं केडिया यांनी म्हटलं आहे.

## तेलकट बटाटे वडे आणि चिकन सूपची आठवण झाली, ठाकरेंच्या युतीवर भाजपचा हल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५मुंबई**

मराठीच्या मुद्यावरून तब्बल २० वर्षांनंतर उद्धव आणि राज ठाकरे एकत्र आले आणि त्यांनी विजयी मेळावा घेतला. आम्ही एकत्र आलोय एकत्र राहण्यासाठी अशी ग्वाही उद्धव ठाकरेंनी मेळाव्याच्या व्यासपीठावरून दिली. दोघं मिळून तुम्हाला फेकून देऊ, असा इशाराही त्यांनी दिला. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र आल्यानंतर भाजपकडून आता मोठी प्रतिक्रिया आली आहे. तेलकट बटाटे वडे आणि चिकन सूपची आठवण झाली असा टोमणा भाजपचे नेते अतुल भातखळकर यांनी मारला.

महाराष्ट्राला, मुंबईला हात घालून तर बघा, असा इशारा राज ठाकरेंनी मोदी-शाहांना दिला. शांत आहोत याचा अर्थ गांडू नाहीत असं त्यांनी भाजपला सुनावलं. मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी करण्याआधी हिंदी भाषेच्या निमित्तानं मराठी माणूस जागा आहे की नाही हे तपासलं गेलं अशी शंकाही त्यांनी व्यक्त केली. त्यानंतर भाजपमधून राज आणि उद्धव यांच्यावर टीका करण्यात आली.

## उद्धव ठाकरेंचे 'मराठीप्रेम' म्हणजे केवळ राजकीय नौटंकी : चंद्रशेखर बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५नागपूर**

वरळीतील संयुक्त सभेनंतर चंद्रशेखर बावनकुळे यांनी ट्विट करत उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली आहे. मराठीच्या गोंडस नावाखाली उद्धव ठाकरे यांनी वरळीत सत्ता गेल्याचं शोकगीत गायलं. पण मुख्यमंत्री असताना २०२२ मध्ये पहिलीपासून हिंदी सक्तीचा अहवाल का स्वीकारला, याचं उत्तर त्यांनी दिलंच नाही, असा सवाल बावनकुळेंनी उपस्थित केला.



मराठी भाषा ही केवळ भावनांमधील अस्मिता न राहता, धोरणांतूनही दिसली पाहिजे. पण मुंबईच्या सत्तेत असताना मराठी माणसाला हद्दपार केलं आणि आता निवडणुका आल्या की पुन्हा मराठीवर बेगडी प्रेम दाखवण्याचा प्रयत्न करत आहात, अशी टीकाही त्यांनी केली.

उद्धव ठाकरेंच्या भाषणातून स्पष्ट होतं की, त्यांचा खरा अजेंडा 'म' म्हणजे 'मराठी' नाही, तर 'म' म्हणजे 'महापालिका' आहे, असा घणाघात करत बावनकुळेंनी उद्धव ठाकरे यांचे मराठीप्रेम निवडणूकपूर्व राजकीय नौटंकी असल्याचे सांगितले.

## संपादकीय ......

# वारी : एक जीवनदृष्टी आणि जीवननिष्ठा

ज्या प्रदेशातील लोक पंढरीला जातात, त्याला महाराष्ट्र म्हणावे, अशी महाराष्ट्राची सरळ, सोपी आणि सुटसुटीत व्याख्या थोर समाजशास्त्रज्ञ इरावती कर्वे यांनी केली होती आणि ती खरीच आहे. महाराष्ट्रात धार्मिक, सांस्कृतिक, साहित्यिक आणि भाषिक उल्लेख किंवा निजात्मता (ओळख) प्राप्त करून देणार्या घटकांमध्ये पंढरीच्या वारीचा समावेश कोणीही टाळू शकत नाही.

वारी याचा अर्थ एखाद्या ठिकाणी ठरावीक वेळी नियमितपणे जाणे. ज्याला आपण वारकरी संप्रदाय असे ओळखतो, त्याच्या नावातच वारीचा उल्लेख आहे. जो वारी करतो तो वारकरी. हा वारकरी वारंवार नियमितपणे कुठे जातो, तर पंढरीला आणि कोणाला भेटण्यासाठी जातो, तर अर्थातच त्याचे उपास्य दैवत असलेल्या विठ्ठलाला. समरूपात सांगायचे म्हणजे वारी ही विठ्ठल दैवताची उपासनापद्धती आहे. हा मुद्दा निश्चितच महत्त्वाचा आहे. वारकरी संप्रदाय हा एक धर्मसंप्रदाय आहे. कोणत्याही धर्मसंप्रदायात धर्म म्हणून उल्लेख आणि मान्यता मिळण्यासाठी त्याला विशिष्ट दैवताची आणि त्याचबरोबर त्या दैवताच्या विशिष्ट उपासनापद्धतीची आवश्यकता असते. उदाहरणादाखल सांगायचे झाल्यास श्री क्षेत्र जेजुरी हे खंडेरायाचे क्षेत्र आहे. त्या दैवताची उपासना करणारे लाखो लोक महाराष्ट्रात आहेत. त्याच्या उपासनेची विशिष्ट पद्धती हजारो वर्षांपासून प्रचलित आहे. त्यात जागर, गोंधळ, तळी भरणे इ.चा समावेश होतो. पण तरीही खंडोबाच्या उपासकांचा स्वतंत्र असा संप्रदाय झाला आहे काय? या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी देण्यात अडचण येते. त्याचे कारण म्हणजे धर्माची प्रतिष्ठा मिळण्यासाठी आणखी एका घटकाची जरूरी असते. तो म्हणजे प्रमाण व पवित्र मानला जाणारा धर्मग्रंथ. वारकरी संप्रदाय महाराष्ट्रात ज्ञानेश्वर-नामदेवांच्या अगोदरपासून प्रचलित होताच, तो उपास्य दैवत विठ्ठल आणि त्याची वारी ही उपासना, या दोन महत्त्वाच्या घटकांमुळे. विठ्ठल दैवत हे पुंडलिकाने पंढरीत प्रस्थापित केले, यात शंका नाही. हे दैवत कोण व कुठले, याची जाणीव तेव्हापासूनच होती. विठ्ठल म्हणजे द्वारकेहून पंढरीत आलेला व पुंडलिकाच्या आग्रहाने तेथेच मूर्तिरूपात उभा राहिलेला कृष्णच होय! या विठ्ठलाने त्याला नियमितपणाने वारंवार भेटायला येणार्यांचा उद्धार करावा, असा वर पुंडलिकाने मागितला व त्या दैवताने दिलासुद्धा. तेव्हापासून महाराष्ट्राच्या कानाकोपर्यातून भाविक भक्त पंढरीला समूहाने म्हणजे दिंडीतून व विशेष म्हणजे गात-नाचत, खेळत येऊ लागले, तीच वारी. ही परंपरा ज्ञानेश्वरांपर्यंत अक्षुण्णपणे चालू राहिली. या मंडळींना वारकरी असे नावही पडले. ज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथामुळे संप्रदायाला तिसरा घटक प्राप्त झाला व त्यामुळे त्याला परिपूर्ण धर्माची प्रतिष्ठा मिळाली. तात्त्विक अधिष्ठान मिळाले. 'ज्ञानदेवे रचिला पाया' या सर्वतोमुखी असलेल्या उक्तीचे हे मर्म आहे. हे वारकरी आपल्याच उपास्य दैवताला भेटण्यासाठी नियमितपणे समूहाने गात, नाचत व खेळत का जातात, याचे तात्त्विक कारण स्पष्ट करणारा पवित्र व प्रमाण ग्रंथ म्हणजे 'ज्ञानेश्वरी'. (आणि अर्थातच 'अमृतानुभव') 'ज्ञानेश्वरी' हा 'भगवद्गीता' या संस्कृतमधील ग्रंथाचा मराठी भाषेतून अर्थ सांगणारा भाष्य ग्रंथ आहे. मुळात गीता हा कृष्ण आणि अर्जुन यांच्यामधील संवाद आहे. रणभूमीवर झालेल्या या संवादाचे कौरव-पांडवांचे होऊ घातलेले युद्ध आणि त्या युद्धाच्या औचित्याविषयी अर्जुनाला पडलेला प्रश्न, हे असले तर त्या प्रश्नाच्या पलीकडे जाऊन कृष्णाने मानवी जीवनाच्या मूलभूत प्रश्नांनाच हात घातला व त्यामुळे त्याच्यातून जीवनाचे एक तत्त्वज्ञान सिद्ध झाले. पंढरीचा विठ्ठल हा कृष्णच असल्याने हे तत्त्वज्ञान आपोआपच विठ्ठलाचे तत्त्वज्ञान ठरले. पण, ते होते संस्कृतमध्ये. ज्ञानेश्वरांनी ते मराठीत उतरविल्यामुळे वारकर्यांना स्वीकारायला काहीच अडचण आली नाही. त्यामुळे आता म्हणजे तेव्हापासून वारकरी संप्रदाय केवळ एक संप्रदाय न राहता त्याला धर्माची प्रतिष्ठा लाभली. एकदा हा मुद्दा लक्षात घेतला की, वारी म्हणजे रिकामटेकड्या किंवा काम नसलेल्या लोकसमूहाने वेळ घालविण्यासाठी चालविलेला उद्योग, असा काही असमंजस विद्वानांनी करून घेतलेला व करून देण्याचा केलेला प्रयत्न किती चुकीचा होता, हे लक्षात येईल. वारी हा मानवी जीवनाचा उत्सव किंवा सेलिब्रेशन आहे. उत्सव हा गाऊन नाचून साजरा करायचा असतो.

# एक अळी बारा पिकांना त्रास देई, असा करा हुमणी अळीचा बंदोबस्त

**विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष**

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक**

हुमणी अळी (होलोट्रीवीया प्रजाती) ही एक बहुभक्षी किड असून महाराष्ट्रामधे होलोट्रीचीया सेरेंटा या प्रजातीमुळे प्रामुख्याने सोयाबीन, कापूस, तूर, या पिकाचे नुकसान होते. पाऊस पडल्यानंतर शेतकऱ्यांनी सायंकाळच्या वेळी शेतातील कडुलिंब, बोर आणि बाभुळ या झाडांचे निरीक्षण करावे. त्यासाठी झाडाखाली प्रकाश सापळे लावावे.

एक मादी भुंगा नष्ट झाल्यास त्यापासुन तयार होणाऱ्या ४० ते ५० अळयांवा बाश होतो. सातत्याने हि किड येणाऱ्या भागात बाभुळ, कार्मिक आणि बोर हयासारख्या झाडावर किटकनाशकाची पहिली फवारणी करावी. भुंग्यांची संख्या प्रत्येक झाडावर सरासरी २० अगर त्यापेक्षा जास्त असेल तर नियंत्रणाची मोहीम राबवावी. किटकनाशकांचा वापर करतांना मजुरांना संरक्षण साधने पुरवावीत. गरज भासल्यास दुसरी फवारणी पहिल्या फवारणीनंतर ३ आठवडयांनी करावी.



**या पिकांवर परिणाम** - हुमणी अळीची प्रौढ मादी पाऊस पडल्यानंतर जमिनीत अंडी देते. हया किडींची अळी अवस्था नुकसान कारक असून ती विविध पिकांच्या मुळावर आपली उपजीवीका करते, उदा. ज्वारी, बाजरी, मका, भात, गहु, ऊस, मिरची, मुंग, करडई, वांगी, कापूस, आणि सुर्यफुल ई. पिकाची मुळे खाल्यामुळे पिके उधळून जमिनीवर कोलमडून पडतात.

**या किडींचे जिवनचक्र** - या किडींचे जिवनचक्र एक वर्षाचे असून ती आपली उपजीवीका जमिनीमधे करते. हि किड अळी अवस्थेत ६ ते ८ महिण्याची असून या अवस्थेत खरीप व रब्बी पिकांची मुळे खाऊन पिकाचे नुकसान करते. एक मादी दररोज एक अंडी घालते. एक मादी मे ते जुलै महिण्यात पोषक वातावरणानुसार ४० ते ५० अंडी घालते. अंडी ३ ते ५ दिवसात उबवून त्यातून बारीक पिवळसर अळया निघतात. त्या अळया गवताच्या कुंजलेल्या मुळ्या खाऊन जगतात. पूर्ण वाढ झालेली अळी ३ त ५ सेंमी रुंद, मांसळ पांदूरकी अथवा मळकट पुढ-या रंगाची उ आकाराची असते.

**लक्षणे काय दिसतात?** शेतात निरिक्षण घेतेवेळी एकरी २० ठिकाणचे मातीचे नमुने (१ फुट, १ फुट, ६ इंच खोल) घेउन त्यात हुमनी अळया आहेत का? ते शोधावे, तसेच पिकामधे विशिष्ट ओळीमधे प्रादूर्भावग्रस्त झाडाची पाने पिवळी पडून सुकतात. अशी झाडे आढळल्यास ती मुळासकट उपटुन मुळे कुरतडलेली आहेत का? हे पहावे.


शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०


**अशी करा उपाययोजना**

सौम्य प्रादुर्भाव तुरकळ ठिकाणीच असल्यास जैविक मित्र बुरशी मेटॅरायझियम ४ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून पिकाच्या मुळाशी आळवणी करावी किंवा मेटॅरायझियम १ किलो प्रति १०० किलो शेणखतात मिसळून प्रति हेक्टरी शेतात फेकावे.

**मित्र बुरशीचा वापस आवश्यक असते.**-लक्षणीय प्रादुर्भाव असल्यास व्यवस्थापनाकरीता खालील पैकी एका रासायनिक किटकनाशकांचा वापर करावा. फिप्रोनील ४० टक्के + इमिडॅक्लोप्रिड ४० टक्के दानेदार ५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात घेऊन द्रावण खोडांजवळ टाकावे. किंवा कार्बोफ्यूरॉन ३ टक्के दानेदार ३३.३० किलो किंवा थायोमेथोक्झाम ०.४ टक्के बायफेनथ्रिन ०.८ टक्के दानेदार १२ किलो प्रति हेक्टर किंवा थायोमेथोक्झाम ०.९ टक्के फिप्रोनिल २ टक्के दानेदार १२ ते १५ किलो प्रति हेक्टर खोडांजवळ जमिनीत ओलावा असतांना मातीत मिसळून दयावे. -

**डी. बी. उंदीरवाडे,** विभाग प्रमुख, कीटकशास्त्रज्ञ विभाग, डॉ. पं. दे. कृ. वि.अकोला




## पावसाळ्यात कोणत्या भाज्या खाणं धोकादायक? जाणून घ्या सविस्तर

**दि.५विदर्भ प्रजासत्ताक**

पावसाळा म्हटलं की गरमागरम चहा आणि भजी डोळ्यासमोर येतात. उकाड्यापासून सुटका देणारा हा ऋतू जितका हवाहवासा वाटतो, तितकाच तो आजारपणांचा धोकाही घेऊन येतो. या काळात वातावरणातील वाढलेल्या ओलाव्यामुळे जीवाणू आणि बुरशीची वाढ झपाट्याने होते, ज्यामुळे अन्नपदार्थ लवकर खराब होतात.



**५ भाज्या पावसाळ्यात खाणे टाळा:**

१. कोंब आलेले बटाटे बटाटा हा प्रत्येकाच्या घरात वापरला जातो, पण पावसाळ्यात त्याला लवकर कोंब येतात. जर बटाट्याला कोंब फुटले असतील तर ते खाणे टाळावे. कारण कोंब आलेल्या बटाट्यांमध्ये 'सोलॅनिन' नावाचे विषारी रसायन तयार होते, जे आरोग्यासाठी अत्यंत हानिकारक आहे आणि त्यामुळे उलट्या, जुलाब किंवा डोकेदुखीचा त्रास होऊ शकतो.

२. पालेभाज्या (पालक, मेथी, इत्यादी) पालेभाज्यांमध्ये पोषक तत्वे भरपूर असली तरी, पावसाळ्यात त्या खाणे टाळावे. कारण त्यांच्या पानांमध्ये ओलावा आणि घाण सहज शोषली जाते. या काळात पानांवर लहान किडे आणि जंतू वाढण्याचा धोका जास्त असतो. तुम्ही या भाज्या कितीही स्वच्छ धुतल्या तरी, काही सूक्ष्मजंतू पानांवर शिल्लक राहू शकतात, जे थेट फूड पॉइझनिंगचे कारण बनतात.

३. कोबी आणि फ्लॉवर या भाज्यांच्या पाकळ्या एकमेकांना घट्ट चिकटलेल्या असतात, ज्यामुळे त्यांच्या आतमध्ये ओलावा टिकून राहतो. हे वातावरण किडे आणि जीवाणूंच्या वाढीसाठी योग्य असते. अनेकदा हे किडे इतके लहान असतात की ते डोळ्यांना दिसत नाहीत आणि भाजीसोबत शिजवले जाऊन आपल्या पोटात जातात, ज्यामुळे पोटाचे गंभीर विकार होऊ शकतात.

४. मशरूम मशरूम दमट वातावरणातच वाढतात, त्यामुळे पावसाळ्यात ते लवकर खराब होतात आणि त्यात बॅक्टेरिया वाढण्याचा धोका असतो. बाजारातून आणलेले मशरूम थोडे जरी काळे किंवा मऊ पडले असतील, तर ते खरेदी करणे टाळा. कारण थोडेसे खराब झालेले मशरूम खाल्ल्यानेही तीव्र फूड पॉइझनिंग होऊ शकते.

५. वांगी पावसाळ्यात वांग्याला लवकर कीड लागते, जी बाहेरून सहज दिसत नाही. याशिवाय, काही लोकांना वांग्याची ॲलर्जी असते, ज्यामुळे पावसाळ्यात पचनक्रिया मंदावलेली असताना पोटात गॅस, सूज किंवा बद्धकोष्ठतेसारख्या समस्या वाढू शकतात.

मग पावसाळ्यात कोणत्या भाज्या खाव्यात?

पोषणतज्ञ किरण कुकरेजा यांच्या मते, या भाज्यांऐवजी तुम्ही आहारात इतर सुरक्षित भाज्यांचा समावेश करू शकता.

दुधी, घोसावळे (तोरी), पडवळ आणि गवार यांसारख्या भाज्या पावसाळ्यात खाण्यासाठी उत्तम आहेत.या भाज्यांमध्ये पाण्याचे प्रमाण कमी असते, त्या लवकर खराब होत नाहीत आणि पचायलाही हलक्या असतात.

त्यामुळे, या पावसाळ्यात चवीसोबतच आरोग्याचीही काळजी घ्या. योग्य भाज्यांची निवड करा आणि आजारपणांपासून दूर राहा.

# जाईन गे माये तया पंढरपुरा

अवघाचि संसार सुखाचा करीन ।
आनंदे भरीन तिन्ही लोक ।।
जाईन गे माये तया पंढरपुरा ।
भेटेन माहेरा आपुलिया ।।
बाप रखुमादेविवरु विठ्ठलेचे भेटी ।
आपुले संवसाटी करुनी राहे ।।

अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या पंढरीनाथ श्री विठ्ठलाच्या भेटीची आर्त ओढ भाविक मनाला कशी लागते हे माऊली श्री ज्ञानोबारायांनी या गोड अभंगातून नेमकेपणाने सांगितलेले आहे. विठ्ठल-रखुमाई हे भक्तांचे माय-बापच आहेत आणि पंढरी हे माहेरच आहे. संत एकनाथांनीही 'माझे माहेर पंढरी, आहे भिवरेच्या तीरी, बाप आणि आई, माझी विठ्ठल-रखुमाई' असे एका अभंगात म्हटलेले आहे. अशा विठ्ठलभेटीच्या ओढीने वर्षातील अनेक एकादशींना वारकरी पंढरीला जात असतात. त्यामध्ये आषाढी एकादशीचे एक वेगळेच महत्त्व आहे. देवशयनी किंवा आषाढी एकादशी हा वारकरी संप्रदायाचा सर्वात मोठा उत्सव असून, रविवारी त्यानिमित्त नेहमीप्रमाणेच अवघी पंढरी दुमदुमणार आहे. लाखोंच्या संख्येने वारकरी आणि भक्त पंढरपुरात विठ्ठल दर्शनासाठी दाखल होतील. देवशयनी एकादशी ही हिंदू पंचांगातील एक महत्त्वाची तिथी आहे.

वैष्णवांसाठी या पवित्र दिवसाचे विशेष महत्त्व आहे. या दिवशी भगवान विष्णू क्षीरसागरात शेषनागावर निद्रिस्त होतात. यानंतर भगवान विष्णू कार्तिक महिन्याच्या शुक्ल पक्षातील एकादशीला म्हणजेच प्रबोधिनी एकादशीला जागे होतात. हाच काळ चातुर्मास म्हणून ओळखला जातो. आषाढी एकादशी म्हणजे चातुर्मासाची सुरुवात असते. या दिवशी विष्णूला प्रसन्न करण्यासाठी उपासना आणि उपवास केले जातात. धार्मिक मान्यतेनुसार विशेषतः या दिवशी भगवंताच्या नामस्मरणात तल्लीन व्हावे, भगवान विष्णूची कथा ऐकावी आणि मंत्रांचा जप करावा, असा प्रघात आहे. आषाढी वारीनिमित्त यंदाही महाराष्ट्र आणि उत्तर कर्नाटकातील लाखो भाविक लोक विठ्ठलनामाचा गजर करत, भूवैकुंठ पंढरीकडे पायी चालत येत आहेत. 'जेव्हा नव्हते चराचर । तेव्हा होते पंढरपूर' अशी ख्याती असलेल्या पंढरपुरात पोहोचताच चंद्रभागेत स्नान करून विठ्ठलाचे दर्शन घेतले जाईल.



या दिवशी शेगाव येथून संत गजानन महाराजांची, आळंदीहून ज्ञानेश्वरांची, देहूतून तुकारामांची, त्र्यंबकेश्वरातून निवृत्तिनाथांची, पैठणहून एकनाथांची, मुक्ताईनगर येथून मुक्ताबाईंची आणि उत्तर भारतातूनही कबीरांची पालखी येते. ज्ञानदेव-नामदेवांपासून ते निळोबांपर्यंत म्हणजे १३ व्या शतकाच्या शेवटच्या चरणापासून ते १७ व्या शतकाच्या मध्यापर्यंतचा, जवळपास पाच शतकांचा काळ हा प्रामुख्याने वारकरी संत साहित्याच्या निर्मितीचा काळ आहे. खेड्यापाड्यातील सर्वसामान्यांपर्यंत पोहोचलेल्या वारकरी साहित्याने मराठी भाषा घडवण्यात मोलाचा वाटा उचलला. पण त्याचसोबत मराठी माणसाच्या विचारपद्धतीवरही अनुकूल प्रभाव पाडला. निळोबाराय पिंपळनेरकर हे वारकरी संप्रदायातील अखेरचे संत कवी. वारकरी संतांचा कवित्वाशी जवळचा संबंध असतो. निळोबांच्या पश्चात पुढे आलेल्या शाहिरांवर संतकाव्याचा स्पष्ट प्रभाव दिसून येतो. विठ्ठल, पंढरपूर आणि संतांची महती सर्व शाहिरांनी गायलेली आढळते. तुकोबांचे कनिष्ठ पुत्र नारायणबाबा यांनी देहू देवस्थानचे संस्थान केले. ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांची संयुक्त पालखी सुरू करून, तिला ज्ञानबा-तुकाराम या भजनाची जोड दिली.

देहूमधील तुकोबांच्या वंशजांचे देवस्थान व फड ही वारकरी पंथातील एक मुख्य परंपरा होय. मधल्या काळात तुकोबांचे शिष्य निळोबाराय पिंपळनेरकर यांच्याकडून प्रचलित झालेली शिष्यपरंपरा, शंकरस्वामी सिन्नरकर यांच्या मार्फत वासकरांच्या घराण्यात आली. मल्लाप्पा वासकर हे या घराण्याचे मूळ पुरुष होत. देहूतील देहूकरांचे एक घराणे पंढरीला येऊन, त्यांनी तेथे स्वतंत्र फड स्थापन केला होता. नंतर आणखी एक घराणे येऊन, त्यांनीही एक स्वतंत्र फड मांडला. अशाप्रकारे देहूकर आणि वासकर अशा दोन्ही परंपरा पंढरीत आल्या. देहूतही गोपाळबाबा, पांडुरंगबाबा, मुरलीधरबुवा यांच्यासारखे विद्वान आणि कर्तबगार पुरुष होऊन गेले. लोकहितवादींनी वारकरी संप्रदायाच्या परंपरेबद्दल आत्मीयतेने आणि गौरवाने लिहिले आहे.

ज्याच्या गळ्यात माळ व हातात पताका, तो कोणत्याही जातीचा असला, तरी त्याची एकच जात आहे, असे वैष्णव समजतात. वारीत सर्व जातींचे भाविक एकमेकांच्या पायी पडतात, याचा उल्लेख लोकहितवादींनी केला आहे. वारकरी सत्य बोलण्याची प्रतिज्ञा करतात आणि अभंग गात व नामस्मरण करत पंढरपुरास, देहूस व आळंदीस जातात. ऊन-पाऊस, थंडी-वारा यांची पर्वा न करता लोक अनेक पावले चालत राहतात. श्रीमंत सरदार संत हैबतबाबा आरफळकर यांनी लष्करी साज व शिस्तीमध्ये माऊलींचा पालखी सोहळा सुरू केला, जो अजूनही त्याप्रमाणेच होत आहे. शतकानुशतके चाललेल्या या वारीत कितीही अडचणी आल्या, तरी माळकर्यांच्या मार्गक्रमणेत बाधा येत नाही. पंढरीची वारी ही एक साधना आणि व्रत आहे. स्वकमाईतून दिंडीला पाचशे ते काही हजार रुपये वारकर्यांकडून भिशी दिली जाते.


अनेक ठिकाणी दिंड्यांच्या पंगती ठरलेल्या असतात; तर बर्याच ठिकाणी अन्नदातांकडून अन्नदान केले जाते. सरकारने वारीच्या वाटेवर करायच्या सोयी-सुविधांसाठी किंवा इतर मदतीसाठी निधी खर्च करावा, अशी सूचना केली जात आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे ठाकूर बुवा समाधी येथे पार पडलेले सुरेख गोल रिंगण आणि पालखी सोहळा भेटीतून ज्ञानेश्वरमाऊली आणि सोपानदेव यांची बंधुभेट याने यावेळचा गुरुवारचा दिवस संस्मरणीय ठरला. तर दुसरीकडे, तुकोबांच्या पालखी सोहळ्यात तोंडले बोंडले येथे धावा केला. दोन्ही संतांच्या पालख्यांचा पंढरपूर तालुक्यात प्रवेश झाला असून, लाखो भाविकांना विठुरायाच्या दर्शनाची ओढ लागलेली आहे. महाराष्ट्राला सुखसमृद्धी लाभो, हीच आषाढी एकादशीनिमित्त पंढरीनाथाच्या चरणी प्रार्थना!

# स्पर्धा परीक्षांसाठीचे प्रशिक्षण ठप्प! सहा महिन्यांपासून प्रवेशपूर्व परीक्षेचा बट्ट्याबोळ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५नागपूर -** राज्य शासनाने बार्टी, सारथी, महाज्योती, टीआरटीआय आदी संस्थांमध्ये एकसूत्रता आणण्यासाठी लागू केलेल्या समान धोरणाचा फज्जा उडाल्याचे चित्र आहे. या सर्व संस्थांकडून यूपीएससी, एमपीएससी, पोलीस भरती, आयबीपीएस परीक्षांसाठी दिल्या जाणार्या प्रशिक्षणाकरिता प्रवेशपूर्व परीक्षा घेतली जाते. याची जबाबदारी 'बार्टी'कडे आहे. मात्र, मागील सहा महिन्यांपासून ही परीक्षाच न झाल्याने सर्वच प्रशिक्षण कार्यक्रम ठप्प पडले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (बार्टी) धर्तीवर राज्यात छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी), महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र संशोधन व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या संस्थांकडून एमपीएससी, यूपीएससी, बँकिंग, रेल्वे व इतर स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण दिले जाते. खासगी संस्थांच्या माध्यमातून दिल्या जाणार्या प्रशिक्षणासाठी प्रवेशपूर्व परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांची निवड केली जाते. समान धोरणापूर्वी बार्टी, सारथी, महाज्योती आपल्या पातळीवरच परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांची निवड करत होते. परंतु समान धोरणामुळे ही व्यवस्था संपुष्टात आली.



प्रशिक्षण कार्यक्रमांची अंमलबजावणी व संनियंत्रणाची जबाबदारी 'बार्टी'चे महासंचालक सुनील वारे यांच्याकडे आहे. त्यामुळे 'बार्टी'ला सर्व संस्थांमधील विद्यार्थी निवडीसाठी परीक्षा घ्यायची आहे. विविध संस्थांनी प्रशिक्षण देणार्या संस्थांची निवडही केली आहे.

### विद्यार्थ्यांचे नुकसान

महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि केंद्रीय लोकसेवा आयोगाची पूर्व परीक्षा मे आणि जून महिन्यात घेतली जाते. यामुळे आता परीक्षेसाठी केवळ दहा महिने शिल्लक आहेत. तसेच अन्य सरळसेवा परीक्षांसाठीही जाहिराती येत असतात. मात्र, विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण बंद आहे.


आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

शनिवार दि. ५ जुलै २०२५

शहर/ग्रामिण


# निशुल्क राखेच्या नियमांना रतन इंडियाची तिलांजली

**प्रति वाहनामागे आकारतात १३५० रुपये**

**एस.एस.कन्स्ट्रक्शन व रतन इंडियाची मिलीभगत**

## नागपूर पॅटर्न अमरावतीत लागू करण्याची मागणी!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५नांदगाव पेठ–** राज्यातील औष्णिक विद्युत प्रकल्पातून निःशुल्क राख देण्याच्या शासनाच्या स्पष्ट आदेशाला नांदगाव पेठ एमआयडीसी मधील रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पाने थेट तिलांजली दिली आहे.शासकीय प्रकल्पामध्ये राखेच्या वाहतुकीसाठी शासन १२५ रुपये प्रति टन अनुदान देत आहे, त्याच राखेवर रतन इंडिया कंपनी व्यवस्थापनाच्या नावाखाली १३५० रुपये प्रति वाहन अशा प्रकारे आकारून व्यावसायिकांची लूट केल्या जात आहे. मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येनंतर परळी औष्णिक केंद्रातील राख माफियांचे



कारनामे चर्चेत आले होते. त्यानंतर नागपूरच्या कोराडी व खापरखेडा औष्णिक केंद्रांमधून राखेचा विनामूल्य पुरवठा सुरू झाला. विशेष म्हणजे नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांच्या पुढाकारामुळे या ठिकाणी सरकारी प्रकल्पांसाठी राख वापरास प्रोत्साहन देण्यात येत आहे. राखेच्या वाहतुकीसाठीही खर्च शासनच उचलत आहे. मात्र रतन इंडियाने या धोरणाकडे साफ दुर्लक्ष करत, राख मिळवण्या साठी येणाऱ्या प्रत्येक वाहनधार काकडून व्यवस्थापन शुल्क या नावाखाली अवैध वसुली सुरू केली आहे. यामध्ये स्थानिक राख व्यवस्थापन करणारी एस.एस. कन्स्ट्रक्शन कंपनी आणि रतन इंडियाचे काही वरिष्ठ अधिकारी संगनमताने हा काळा बाजार साधत आहेत. यामुळे व्यवसायिकांना आर्थिक फटका बसत असून, शासकीय धोरणाला हरताळ फासला जात आहे.सध्या नागपूर पॅटर्नमुळे राखेचा उपयोग पर्यावरणपूरक व बांधकाम क्षेत्रातील शासकीय प्रकल्पांत मोठ्या प्रमाणावर होतो आहे. त्यामुळे अमरावती जिल्हाधिकारी यांनी नागपूरच्या धर्तीवर निर्णय घ्यावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

### १३५० रु.नगदी घेऊन पावती केवळ ३५० ची

उल्लेखनीय बाब म्हणजे याठिकाणी राख वाहतूक करणाऱ्या वाहन धारकांकडून १३५० रुपये नगदी घेण्यात येते मात्र एस.एस. कन्स्ट्रक्शन कंपनी केवळ ३५० रुपयांची पावती देते.ही बाब शासनाच्या डोळ्यात धूळफेक करणारी असून याबाबत अनेक राख व्यावसायिकांनी आक्षेप घेतला आहे. शासनाने याबाबत योग्य ती चौकशी करावी अशी मागणी देखील जोर धरू लागली आहे.

### दररोज ५ लाखांचे उत्पन्न

रतन इंडिया औष्णिक प्रकल्पातील राख वाहनांमध्ये भरण्यासाठी रतन इंडियाने स्थानिक एस.एस.कन्स्ट्रक्शन नामक एजन्सी नेमलेली असून दोघांमध्ये फिफ्टी फिफ्टी चा फॉर्म्युला ठरला आहे. रतन इंडिया मधून दररोज साडे तीनशे पेक्षा अधिक वाहने राखेची वाहतूक करतात त्यामुळे तब्बल पाच ते सहा लाख रुपयांचे उत्पन्न या कंपनीला होते.यामध्ये सदर एजन्सी आणि रतन इंडियाचे वरिष्ठ अधिकारी हा मलिदा लाटून घेतात.त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी या बाबींकडे लक्ष देण्याची गरज आहे.

# देशातील पहिल्या मराठी विद्यापीठात अभ्यासक्रम सुरू

## पहिल्या दिवशी ५२ विद्यार्थ्यांचे ऑनलाइन प्रवेश

### मुख्यमंत्री फडणवीस यांचे मान्यवरांनी आभार मानले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५रिद्धपूर,** देशातील पहिल्या मराठी भाषेच्या विद्यापीठात अभ्यासक्रम सुरू झाले आहेत. मराठी भाषा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू अविनाश आवळगावकर यांनी पदभार स्वीकारला. त्यामुळे अखिल भारतीय महानुभाव परिषदेची गेल्या पन्नास वर्षांपासूनची मराठी भाषा विद्यापीठाची मागणी आता पूर्ण झाली आहे. मराठी भाषेतील पहिले प्रमुख पुस्तक 'लीलाचरित्र' रिद्धपूरमध्ये लिहिले गेले.रिद्धपूर हे भारतातील महानुभाव पंथाची काशी म्हणून ओळखले जाते. भगवान श्री गोविद यांचे जन्मस्थान असण्यासोबतच ते त्यांची कर्मभूमी देखील आहे. हेच कारण आहे की आजही रिद्धपूरमध्ये श्री प्रभूच्या चरणांना समर्पित २५० मंदिरे आहेत.



यासोबत, गोपीराज ग्रंथालयात अजूनही शेकडो हस्तलिखित ग्रंथ आहेत !म्हणूनच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारने रिद्धपूरमध्ये देशातील पहिले मराठी भाषा विद्यापीठ सुरू करण्याचा निर्णय घेतला ! मराठी भाषा विद्यापीठात ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. यामध्ये पदवी अभ्यासक्रम म्हणजे बीए मराठी (भाषा आणि लिपी), जर्मन, रशियन, इंग्रजी, बीपीए (नाटक आणि रंगमंच), बीपीए (संगीत), बीटीटीएम (पर्यटन आणि प्रवास व्यवस्थापन), बीईएम (पर्यावरण व्यवस्थापन). पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये एम.ए. मराठी समाज भाषा विज्ञान आणि बोली विज्ञान, मराठी शाखीय भाषा आणि साहित्य मानसशाख भूगोल नैसर्गिक संसाधने आणि पर्यावरण, एम.पीए.ए. संगीत, याशिवाय, मराठी भाषेत अध्यापनाच्या अनेक व्यावसायिक संधी देखील या अभ्यासक्रमाद्वारे उपलब्ध करून दिल्या जातील, डिप्लोमा कोर्समध्ये प्रवेश मिळविण्यासाठी, कोणत्याही भाषेत बारावी उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे. ही माहिती मराठी भाषा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. अविनाश आवळगावकर यांनी दिली. यावेळी अखिल भारतीय महानुभाव परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष महंत करंजेकर बाबा, महंत नागराज बाबा, महंत गोपीराज बाबा, महंत वायंड देशकर बाबा, महंतकृष्णराजबाबा आणि श्रीराघवेंद्रदादाबिडकर सुभाषपावडेयांनी मराठी भाषा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू ए. बो. गावकर यांनी पुष्पगुच्छ देऊनत्यांचे भव्यस्वागत केले. यावेळीप्रा.डॉ. सुनितासांगोळे, डॉ. केशवतुपे (निबंधक), डॉ. यशपाल गुलदे (लेखा अधिकारी), राम राठोर (प्रशासकीय अधिकारी), सतीशमानकर (वैयक्तिक सहाय्यक), सुजाता आसुलकर, वैशाली ढेले, अतुल पडोळे, राजू लाटे, आयुष नंदुरेकर, उभयराव सावंत आदी उपस्थित होते.

# माजी आमदार जगताप यांच्याविरोधात तहसीलदार संतप्त

## निवासी उपजिल्हाधिकारी भटकर यांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती–** महाराष्ट्र राज्य तहसीलदार व नायब संघटनेने माजी आमदार काँग्रेस नेते वीरेंद्र जगताप यांनी महसूल अधिकाऱ्यांशी केलेल्या गैरवर्तनाच्या निषेधार्थ निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर यांना निवेदन दिले.

वीरेंद्र जगताप यांनी नायब तहसीलदार वसंत पखाले यांना शिवीगाळ केली. त्यांनी असेही म्हटले की, निवडणूक विभागात मूर्ख लोक बसतात. निवडणूक विभागात असूनही ते कसे बसले? जगताप यांच्यावर गैरवर्तन केल्याचा आरोप निवेदनातून केला आहे. चांदूर रेल्वेच्या एसडीओ यांचा सर्वांसमोर असंवैधानिक भाषेत अपमान केल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. माजी आमदार जगताप यांना रोखण्याचा प्रयत्न केला तेव्हा म्हणाले की, ते याच भाषेत बोलतील. जर तुमच्यात. हिंमत असेल तर ३५३ अंतर्गत गुन्हा दाखल करा, असे निवेदनात नमूद आहे. तहसीलदार आता माजी आमदार जगताप यांचे काहीही ऐकणार नाहीत. जगताप यांनी शिवीगाळ आणि धमकी दिल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला. त्यांनी फोनवरून धमकीही दिली. कारे ची भाषा वापरल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.



निवेदन देताना तहसीलदार विजय लोखंडे, तहसीलदार संजय गरकन, रवींद्र कानडजे, पूजा मातोडे, मयूर काळसे, अभय घोरपडे, रामदास शेळके, अजितकुमार येळे, नायब तहसीलदार एन.एस. तिवारी, प्रभारी तहसीलदार मोर्शी व्ही. बी. वानखडे, प्रभारी तहसीलदार सुभेदार, तहसीलदार प्रदीप शेवाळे, पुष्या डाबेराव, अश्विन जाधव, चांदूर रेल्वेच्या एसडीओ तेजश्री कोरे, मोर्शीचे एसडीओ प्रदीप पवार, अचलपूरचे बळवंत अरखराव आदी उपस्थित होते.

# बडनेरा-नाशिक रोड मेमूला मुदतवाढ; ९२ फेऱ्या होणार

## १ जुलै ते ३० सप्टेंबरपर्यंत प्रवाशांना मिळणार सुविधा; मध्य रेल्वेचा निर्णय, प्रवास खर्चातही होणार बचत



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती –** बडनेरा-नाशिकरोड मेमूला मध्य रेल्वेने १ जुलै ते ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे बडनेरा व अमरावतीकरांना दिलासा मिळाला आहे. सकाळी १०.०५ वाजता बडनेरा सुटणारी ही मेमू शेगावला जाण्यासाठी सोयीची गाडी आहे. प्रवाशांचा वाढता प्रतिसाद बघता या गाडीला चौथ्यांदा मुदतवाढ देण्यात आली. या गाडीच्या एकूण ९२ फेऱ्या होणार असल्याची माहिती मध्य रेल्वेद्वारे देण्यात आली.

ही अनारक्षित गाडी असल्यामुळे जेथे जागा मिळेल तेथे प्रवाशी बसतात. अनेकजण उभे राहूनही प्रवास करतात. मुंबईतील लोकलच्या धर्तीवरच या मेमूचे निर्माण करण्यात आले आहे. गाडी क्र. ०१२११ बडनेरा-नाशिकरोड व गाडी क्र. ०१२१२ नाशिक रोड-बडनेरा मेमू दररोज धावणार असल्यामुळे प्रवाशांना अकोला, शेगाव, भुसावळ येथे जाण्यासाठी अन्य कोणत्याही गाडीची वाट बघण्याची आवश्यकता नाही. या मेमूचा वेगही चांगला आहे. ही गाडी लहान, मोठ्या सर्वच स्थानकांवर थांबा घेत असली तरी या मेमूने प्रवास करणे कंटाळवाणे वाटत नाही. मुंबई, पुणे मार्गावरील गाड्यांचे आरक्षण नेहमीच फुल्ल असते. अशात प्रवाशांना अनारक्षित रेल्वेची आवश्यकता होती.

ते बघता मध्य रेल्वेने बडनेरा ते नाशिकरोड मेमूची सोय केली. त्यामुळे कमी खर्चात प्रवास करणे शक्य झाले आहे. केवळ शेगावकडे जाणाऱ्या भाविकांसाठीच नव्हे तर अकोला, नांदुरा, भुसावळ येथे जाणारे चाकरमाने, व्यापारी आणि विद्यार्थ्यांसाठी ही मेमू सुविधाजनक आहे.

सकाळी ९.३० वाजता अमरावती मॉडेल स्थानकावरून निघते बडनेरा-नाशिकरोड मेमू रेल्वे नाशिकरोड येथून पहाटे ५ वाजता बडनेरा स्थानकावर पोहोचते. त्यानंतर ती स्वच्छतेसह पाणी भरण्यासाठी अमरावती मॉडेल रेल्वे स्थानकावर येते. अमरावती स्थानकावरून ती सकाळी ९.३० वाजता बडनेराकडे रवाना होते. तेथून सकाळी १०.०५ वाजता नाशिक रोडकडे निघते. ज्या प्रवाशांना ही मेमू अमरावती स्थानकावरून सुटते याची माहिती आहे, ते अमरावतीतूनच या मेमूत बसतात. उर्वरित प्रवासी मात्र बडनेराहून मेमूत बसतात.

# १३ फूट लांबीच्या अजगराने घेतला बकरीचा जीव

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.५तिवसा–** तालुक्यातील सुरवाडी खुर्द शेत शिवार परिसरात एका १३ फूट लांबीच्या अजगराने २० किलो वजनाची बकरी गिळण्याचा प्रयत्न केला. ही माहिती सर्पमित्राला मिळताच त्यांच्या अथक प्रयत्नाने अजगराचे प्राण वाचले. मात्र बकरीला यात जीव गमवावा लागला. शुक्रवारी दुपारी ही घटना घडली आहे.

तालुक्यातील सुरवाडी येथील शेत शिवारात एका १३ फूट अजगराने बकरीला शिकार बनवण्याचा प्रयत्न केला. सुरवाडी खुर्द शेत शिवारात परिसरातील भूषण भोंबे यांच्या बकऱ्या नेहमीप्रमाणे आजही चरण्यासाठी गेल्या होत्या. त्याच भागात भला मोठा अजगर दडून बसला होता. अजगराने बकरीवर झडप घालून तिला गिळण्यासाठी विळखा घातला. विळखा मारल्याने अजगराला कमालीचा त्रास होत होता. ही बाब काही लोकांच्या निदर्शनास येताच त्यांनी ही माहिती सर्पमित्र अविनाश पांडे यांना दिली.

पांडे यांनी अजगराच्या तावडीतून त्या बकरीला वाचवण्यासाठी खूप प्रयत्न केले. परंतु, बकरीचा यात जीव वाचला नाही. मात्र, अजगराचे प्राण वाचवण्यात ते यशस्वी झाले. सर्पमित्र अविनाश पांडे यांनी अजगराला सुरक्षितपणे पकडल्यानंतर वन विभागात नोंद करून त्याला नैसर्गिक अधिवासात सोडले.

### मृत बकरीचा पंचनामा

सर्पमित्राने अजगराला सोडले जंगलात सुरवाडी भागात अजगराने बकरीला आवळल्याने तिचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद घेण्यात आली असून मृत बकरीचा देखील पंचनामा करण्यात आला. सर्पमित्राने अजगराला सुखरूप पकडून आणले. याची नोंद घेतल्यानंतर अजगराला सुखरूप नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आल्याची माहिती वन विभागाद्वारे देण्यात आली.



# मेळघाटातील पाच शिक्षक निलंबित, सीईओंच्या कारवाईमुळे खळबळ : अनियमितता भोवली

**विदर्भ प्रजासत्ताकदि.५ मेळघाट –** मेळघाटच्या आकस्मिक दौऱ्यावर गेलेल्या जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी शुक्रवारी (ता.४) रोजी अनियमिततेच्या कारणावरून जिल्हा परिषदेच्या पाच शिक्षकांना निलंबित केले आहे. तर एका शिक्षकाला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. या कारवाईमुळे शिक्षण विभागात चांगलीच खळबळ उडाली आहे.

निलंबीतांमध्ये एकताई येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील दोन, पुटीदा येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील दोन तर बिंबा येथील एका शिक्षकाचा समावेश आहे. विशेष म्हणजे एकाचवेळी पाच शिक्षकांवर निलंबित होण्याची ही पहिलीच वेळअसल्याचे सांगितले जात आहे.



जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र या शुक्रवारी (ता.४) आकस्मिक मेळघाटात पोहोचल्या. त्या ठिकाणी त्यांनी आरोग्य केंद्रासह काही शाळांची झाडाझडती घेतली. चिखलदरा तालुक्यातील अनेक जि. प. शाळांना भेटी दिल्या. या दरम्यान त्या चिखलदरा तालुक्यातील एकताई येथील शाळेत पोहोचल्या, त्यांनी तिथली अवस्था पाहिली, शाळेत कुठल्याही मूलभूत सुविधा नाही, शालेय पोषण आहारात सुद्धा अनियमितता आढळून आली. हाच प्रकार पुटीदा व बिंबा येथील जिप शाळेत सुद्धा उघडकीस आला. सीईओंची ही भेट आकस्मिक असल्याने शिक्षक गाफिल राहिले. सीईओंनी शाळांना भेटी देत देतील रजिस्टर, हजेरीपट, शालेय पोषण आहाराचा रेकॉर्ड तपासला.

त्यामध्ये अनियमितता आढळून आल्याने तसेच शिक्षणाचा घटलेला दर्जा या बाबींचा ठपका ठेवत त्यांनी पाच शिक्षकांना निलंबित केले. याशिवाय हतरु जिप शाळेत प्रतिनियुक्तीवर असलेल्या शिक्षकाला कारणे दाखवा नोटीस दिली आहे.शुक्रवारी सायंकाळपर्यंत निलंबित करण्यात आलेल्या शिक्षकांची नावे स्पष्ट झाली नाही. विशेष म्हणजे मागील काही दिवसांपासून मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी प्रशासनात अनेक सुधारणा आणण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यास सुरवात केली आहे. प्रामुख्याने मेळघाटातील शिक्षण आणि आरोग्यवस्थेवर त्यांचा सर्वाधिक फोकस दिसून येत आहे. त्यातच त्यांनी शुक्रवारी मेळघाटात झाडाझडती घेत शिक्षकांवर कारवाई केल्याने चांगलीच खळबळ उडाली आहे.



मेळघाटातील अनेक शाळांना भेटी दिल्या असून त्या भेटींमध्ये अनेक प्रकारची अनियमितता आढळून आली आहे. त्यामुळे विविध शाळांमधील पाच शिक्षकांना निलंबित करण्यात आले आहे. तर एका शिक्षकाला कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे. **–संजिता महापात्र,** मुख्यकार्यकारी अधिकारी. जिप अमरावती.

# नांदगाववासीयांना शुद्ध पाणी कधी मिळणार?

## दोन वर्षांपासून पाईपलाईन चे काम सुरू

### जल जीवन मिशनचा ढिसाळ कारभार



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५ नांदगावपेठ –** हर घर जल, हर घर नल या भारत सरकारच्या महत्वाकांक्षी योजनेला सुरुवात होऊन तब्बल दोन वर्षे झाली, तरीही नांदगावपेठसह परिसरातील ३२ गावांतील नागरिकांना अद्याप शुद्ध पिण्याचे पाणी मिळत नाही. यामागे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व संबंधित कंत्राटदार यांची हलगर्जी व निष्काळजी भूमिका असल्याचा गंभीर आरोप माजी जिल्हा परिषद सदस्य व जलसंधारण समितीचे सदस्य नितीन हटवार यांनी केला आहे.

महामार्गालगत नांदगाव पेठ येथील शासकीय वसाहत मध्ये उभारण्यात आलेली तब्बल २० लाख लिटर क्षमतेची जलटाकी सध्या अपूर्ण अवस्थेत असून, टाकीत मोठ्या प्रमाणात लिकेजेस दिसून येत आहेत. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, योजनेचे अर्धवट काम करून कंत्राटदारांनी निधी उचलला आहे. पाइपलाईनचे जाळे पूर्ण गावभर टाकले गेले असले तरी पाणीपुरवठा सुरु झालेला नाही. एमआयडीसी परिसरातील दूषित पाण्यामुळे आधीच पिण्याचे स्रोत बिघडलेले असताना, ही योजना सुरु न झाल्याने नागरिक विविध आजारांनी त्रस्त झाले आहेत. अनेक घरांमध्ये पाण्यासाठी भटकंती करावी लागत असून, लहान मुले, वृद्ध यांना त्रास सहन करावा लागत आहे.नांदगावकर जनतेचा संयम आता सुटू लागला आहे. योजनेचे काम झपाट्याने पूर्ण न केल्यास नागरिक रस्त्यावर उतरतील, असा इशाराही नितीन हटवार यांनी दिला आहे. कोट्यवधींच्या योजनेत मिलीभगत?कोट्यवधी रुपये खर्चूनही जर योजना पूर्ण होत नसेल, तर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व कंत्राटदार यांच्यातील मिलीभगतीचा संशय नाकारता येत नाही, असा स्पष्ट आरोप नितीन हटवार यांनी केला. त्यांनी ही योजना तात्काळ तांत्रिकदृष्ट्या दुरुस्त करून, नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

# मुंबईतील संवादासाठी लप्पीभैया जाजोदिया यांचा विशेष सम्मान




**विदर्भ प्राजसत्ताक**

**अमरावती. दि. ५** कार्यक्रमा दरम्यान, विशेष आदरणीय अतिथी लप्पीभैया जाजोदिया यांना सांस्कृतिक संरक्षण क्षेत्रात सामाजिक सेवा, मानवी मूल्ये आणि अनन्य योगदानासाठी गौरविण्यात आले. त्याचे सत्य समर्पण, निःस्वार्थ सेवा आणि मानवतेची वचनबद्धता हे समाजासाठी प्रेरणा म्हणून वर्णन केले गेले. चर्चेत भगवान महाविरा, अहिसा, समता, सत्य आणि अपरिग्राहा च्या अभिजात तत्त्वांवर दिवे फेकले गेले. हा कार्यक्रम देवेंद्र ब्रह्मचारीच्या शुभ दिशेने झाला. लोकसभा सभापती ओम बिर्ला, मंत्री मंगलप्रभात लोधा, विधान परिषद सभापती राम शिंदे, केंद्रीय मंत्री मुरली देओडा हे मुख्य पाहुण्यांचे उपस्थित होते. त्याच वेळी, अनेक धार्मिक नेते, राजकारणी, परोपकारी आणि विचारवंतांनी सहभाग दिला आणि ऐतिहासिक कल्पनांच्या संगमाचे रूप दिले.

# परिवर्तन प्रबोधिनीचे 'साहित्य सेवा गौरव' पुरस्कार जाहीर








**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती–** परिवर्तन प्रबोधिनी,अमरावती तर्फे दिले जाणारे साहित्य सेवा गौरव पुरस्कार नुकतेचं घोषित करण्यात आले असून सदर पुरस्कार हे प्रसिद्ध लेखक डॉ. श्यामसुंदर निकम. (माजी जिल्हा शल्य चिकित्सक)अमरावती, इंजि. वा.पा. जाधव (समीक्षक व सिने अभ्यासक), श्री आबासाहेब कडू (सुप्रसिद्ध वऱ्हाडी साहित्यिक) इंजि. दीपक दारव्हेकर, प्रसिद्ध कवयित्री व लेखिका अनघा सोनखासकर, संजीवनी काळे यांना त्यांच्या कार्यासाठी प्रदान करण्यात येणार आहे.हा पुरस्कार वितरण सोहळा ६ जुलै रोजी कांचन रिसॉर्ट,अमरावती येथे होऊ घातलेल्या दुसऱ्या परिवर्तन विचारवेध साहित्य संमेलनात संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. रा. गो. चवरे तसेचं विविध साहित्यिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत सकाळी १०.०० ते १२.३० या वेळेत होणार आहे.

साहित्य क्षेत्रात दमदार लेखन करणारे माजी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. श्यामसुंदर निकम यांना त्यांच्या उत्कृष्ट साहित्य लेखनाकरिता, प्रसिद्ध साहित्यिक व सिने अभ्यासक इंजि. वा. पां. जाधव यांना त्यांच्या यशस्वी साहित्य लेखनाकरिता,सुप्रसिद्ध वऱ्हाडी साहित्यिक आबासाहेब कडू यांना त्यांच्या दर्जेदार वऱ्हाडी साहित्य लेखनाकरिता,इंजि.बाप माझा कार,परिवर्तन पर्व चे संपादक श्री दीपक दारव्हेकर यांना उत्कृष्ट लेखन व संपादनाकरिता तसेचं अनघा सोनखासकर यांना उत्कृष्ट लेखन व अनुवादाकरिता तर कवियित्री संजीवनी काळे यांना त्यांच्या उत्कृष्ट काव्यलेखनाकरिता साहित्य सेवा गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून याबद्दल या सर्व मान्यवरांचे परिवर्तन प्रबोधिनी अध्यक्ष,प्रा.डॉ.शोभा रोकडे ,रेखा बेलसरे,प्रा.डॉ.मंदा नांदूरकर,सौ.वासंती गौपाल,सरिता काठोळे, विशाखा पाळेकर, माधवी देशमुख,ॲड.प्राजक्ता राऊत,यांनी अभिनंदन केले असून विविध स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# ब्लॅक स्पॉट शोधून कायमस्वरूपी उपाययोजना करणार- साळुंके



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अमरावती–** औद्योगिक ग्राहकांना अखंड व स्थिर वीज पुरवठा देण्यासाठी महावितरण प्रयत्नशील असून, आगामी काळात औद्योगिक वीज सेवेला अडथळा ठरणारे ब्लॅक स्पॉट शोधून त्यावर कायमस्वरूपी उपाय योजना करण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी केले.

मुख्य कार्यालयाने दिलेल्या निर्देशानुसार विद्युत भवन अमरावती येथे शुक्रवारी (दि. ४) महावितरण आणि औद्योगिक संघटना यांची बैठक पार पडली. यावेळी अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंते प्रदीप पुनसे, अमित शिवलकर, राजेश घाटोळे, प्रफुल्ल लांडे, उपविधी अधिकारी प्रशांत लहाने, सातुर्णा को. ऑप. इंडस्ट्रियल असोसिएशनचे अध्यक्ष वीरेंद्र लड्डा, सचिव एमआयडीसी असोसिएशन आशिष सावजी, अतिरिक्त अमरावती एमआयडीसी नांदगाव पेठ इंडस्ट्रियल असोसिएशनचे अध्यक्ष अफाक सुभेदार, सचिव जगदिश वाधवानी, रविकुमार डागा, व्ही. पी. बनारसे, नंदकिशोर पेटले, मंगेश चौधरी, नीलेश काकिर्डे, जावेद खान आदी औद्योगिक ग्राहक उपस्थित होते. या वेळी औद्योगिक ग्राहकांशी झालेल्या चर्चेनंतर मुख्य अभियंता म्हणाले की, औद्योगिक ग्राहक हे महावितरणसाठीच नाही, तर जिल्ह्याच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे असून, त्यांना दर्जेदार सेवा देणे ही महावितरणची जबाबदारी आहे. त्यामुळे यापुढे औद्योगिक ग्राहकांच्या समस्या सोडवण्याला प्राधान्य राहणार असून, दुरुस्ती कालावधी कमीत –कमी करण्यावर भर देण्यात येईल. याचबरोबर औद्योगिक ग्राहकांच्या मागणीनुसार सातुर्णा एमआयडीसीतील फिडर वेगळे करण्याबाबतही प्रयत्न केले जातील.

नांदगाव पेठ एम. लेआऊट वसाहतीसाठी महावितरणच्या आरडीएसएस योजनेत स्वतंत्र ३३ केव्ही उपकेंद्राचे नियोजन केले आहे. दरम्यानच्या काळात नांदगाव पेठ एमआयडीसीतील वीज समस्यांवर तोडगा काढण्यासाठी विविध ठिकाणी एबी स्विच लावण्यात येणार असून, वितरण पेट्या, किट-कॅट आदीचे मेंटेनन्स आणि देखभाल दुरुस्तीच्या कामात तत्काळ हाती घेऊन ते दुरुस्त करण्याचे निर्देश मुख्य अभियंता यांनी कार्यकारी अभियंत्यांना दिले आहेत.

# तक्रार घेऊन गेलेल्या न.प. कर्मचाऱ्याला नऊ तास ताटकळत ठेवले

## अचलपूर पोलीस ठाण्यातील प्रकार, तक्रारदाराच्या नावातही चूक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.५अचलपूर** साफ सफाईचे काम करून घेणाऱ्या न.प.च्या बिट प्यूनला दोन नागरिकांनी शिवीगाळ करीत कामात अडथळा निर्माण केला. याबाबतची तक्रार देण्यास गेलेल्या नगरपरिषदेच्या या कर्मचाऱ्याला अचलपूर पोलिसानी तब्बल नऊ तास पोलीस ठाण्यात बसवून ठेवल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे. तसेच तक्रार नोंदविताना नावातही चूक केल्याचेही म्हटले आहे.अचलपूर नगरपरिषदेच्यावतीने शहरात साफसफाईची कामे केली जातात. ३ जुलै रोजी नगरपरिषदेचे वॉर्ड जमादार (बिट प्यून) अब्दुल शहीद अब्दुल कदीर हे साफसफाईच्या कर्तव्यावर होते. हिरापुरा प्रभाग क्र. १५ व १८ येथे साफसफाईची कामे सुरू होती. ट्रॅक्टरव्दारे कचरा उचलला जात होता. याचवेळी या प्रभागातील दोन व्यक्तींनी येऊन साफ सफाईच्या कारणावरून अब्दुल शहीद अब्दुल कदीर यांच्या शी वाद घातला. शिवीगाळ करून काम करण्यास मज्जाव केला. त्यामुळे अब्दुल शहीद अब्दुल कदीर हे अचलपूर पोलीस ठाण्यात सकाळी ९ वाजता तक्रार करण्यासाठी पोहोचले. परंतु अब्दुल शहीद यांना पोलीस ठाण्यातच बसवून ठेवले. सायंकाळी सहा वाजता तक्रार घेतल्यानंतर त्यांना जाण्यास सांगितले. तब्बल नऊ तास अचलपूर पोलिसांनी आपल्याला ठाण्यात बसवून ठेवले व तक्रारदाराच्या नावातही चूक केल्याचे अब्दुल शहीद यांचे म्हणणे आहे. दुसऱ्या दिवशी सोबत तीन आरोग्य निरीक्षकांना सोबत घेऊन गेल्यानंतर एफआयआर कॉपी अचलपूर पोलिसांनी दिल्याचेही अब्दुल शहीद यांनी सांगितले.

# प्राण्यांबरोबर पाहायला मिळेल इतिहासाची सफर, गोरेवाड्यात होणार 'थीम पार्क' होणार




**विदर्भ प्रजासत्ताक दि.५नागपूर–** बाळासाहेब ठाकरे आंतरराष्ट्रीय गोरेवाडा प्राणिसंग्रहालयात तिसऱ्या टप्प्यात 'पुरातत्त्वीय थीम पार्क' तसेच झू क्षेत्रात 'डायनासोर पार्क', जीवाश्म संग्रहालय आणि रेल फॉरेस्ट थीम पार्क उभारण्यासाठी विकास आराखडा तयार करण्यात येत आहे. नवी दिल्लीतील केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाकडून ५०७ हेक्टरवर होणाऱ्या गोरेवाडा प्राणिसंग्रहालयाच्या मास्टर प्लानला मिळालेल्या मंजुरीनुसार ही कामे करण्यात येणार आहेत.

गोरेवाडा प्राणिसंग्रहालयात पहिल्या टप्प्यात 'इंडियन सफारी'चे काम पूर्ण होऊन २६ जानेवारी २०२१ रोजी उद्घाटन झाले होते. दुसऱ्या टप्प्यात प्रस्तावित 'अफ्रिकन सफारी'साठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वनमंत्री गणेश नाईक यांच्या उपस्थितीत १ जुलै रोजी एफडीसीएम गोरेवाडा झू लिमिटेड आणि नॅशनल बिल्डिंग कन्स्ट्रक्शन कॉर्पोरेशन यांच्यात सामंजस्य करार (एमओयू) झाला आहे. त्यानुसार आफ्रिकन सफारीचे काम दीड वर्षात पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. पुढील टप्प्यात 'पुरातत्त्वीय थीम पार्क' उभारण्याचे काम होणार आहे. या पार्कचा आराखडा तयार करण्याचे काम पुण्यातील डेक्कन कॉलेजला देण्यात आले होते. मात्र, त्यांनी आराखडा तयार न केल्यामुळे आता राज्य पुरातत्व विभागाची मदत घेण्यासाठी चर्चा सुरू करण्यात आली असून याबाबत लवकरच सामंजस्य करार होणार आहे. करारानंतर हा आराखडा स्वतंत्र मंजुरीसाठी राज्य सरकारकडे पाठवला जाईल.

### 'डायनासोर पार्क'मध्ये काय असेल ?

गोरेवाडा प्रकल्पाचे व्यवस्थापक शतानिक भागवत यांच्यानुसार जंगल सफारीकडील भागात 'डायनासोर थीम पार्क' उभारले जाईल. यात पृथ्वीची निर्मिती कशी झाली, डायनासोर कसे आले, मानवाची उत्पत्ती आदींची माहिती थीमच्या स्वरूपात दिली जाईल. मध्य भारतात आढळणाऱ्या वनस्पती आणि प्राण्यांचे विविध जीवाश्मही येथे प्रदर्शित केले जातील. यासोबतच झू क्षेत्रालगत एक्झॉटिक एव्हियरी आणि रेल फॉरेस्ट थीम पार्कही उभारले जाईल. येथे उष्ण कटिबंधातील सुंदर आणि रंगीबेरंगी पक्ष्यांना ठेवण्यात येणार आहे.

# राष्ट्रसंताच्या पादुका पंढरपूरसाठी रवाना



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४ गुरुकुंज मोझरी** आषाढी एकादशीनिमित्त वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या पालखीसह चरण पादुका गुरुकुंज आश्रमातून पंढरपुरकरिता रवाना झाल्यात. तत्पूर्वी जनार्दनपंत बोथे, प्रकाश वाघ, सुशिलकुमार वनवे आदींच्या हस्ते पादुका पूजन करण्यात आले.

यावेळी पालखीसोबत सुशिल मवनवे, एकनाथ गावत्रे, राजेंद्र कठाळे, कृषा बराटे, जीवन मेटकर, अंकीत यावलकर, वसंत बोंडे, गणेश जवंजाळ, प्रमोद देशमुख, गणेश घाटोळ, सुधाकर जाधव, अमोल बारंगे रवाना झाले.याप्रसंगी विलास साबळे, डॉ. राजाराम बोथे, त्र्यंबक निचित, डॉ. जयस्वाल, डॉ.गहुकर, प्रकाश तारेकर, डॉ. उमप आदी उपस्थित होते. राष्ट्रसंतांची पालखी भारवाडी, टाकरखेडा, पिंपळखुटा, कौंडण्यपूर, कारंजा लाड मार्गे पंढरपूरकडे प्रस्थान करणार आहे. रविवारी (दि. ६) पंढरपूर येथे भजन सादरीकरण व कार्यकर्ता मेळावा.प्रचारक किर्तन सामुदायिक प्रार्थना व रात्री सुशिल महाराज वनवे यांचे किर्तन होईल. ७ जुलै रोजी सामुदायिक ध्यान व प्रकाश मवाघ यांचे गोपाल काल्याचे किर्तन होईल. त्यानंतर पालखी परतीच्या प्रवासाला निघेल. १९ जुलै रोजी ती अमरावती, तर २० जुलै रोजी गुरकुंज मोझरी येथे पोहोचेल. तेथे समारोपिय कार्यक्रम होईल.

# बोगस अनुभव प्रमाणपत्र घेऊन मिळविलेले सव्वासात कोटीचे भोजन कंत्राट होणार रद्द

**विदर्भ प्रजासत्ताक दि.५यवतमाळ–** अमरावती येथील श्री स्वामी समर्थ सर्व्हिसेसने पुसद आदिवासी विकास प्रकल्पातील वसतिगृहांचे भोजन कंत्राट दोन बोगस अनुभव प्रमाणपत्र जोडून मिळवल्याचे प्रकरण 'लोकमत'ने उजागर केले होते. त्यानंतर नाशिक आयुक्तांनी चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश अपर आयुक्तांना दिले होते. बोगस अनुभव प्रमाणपत्र प्रकरणात संस्थाचालक राहुल गवळीविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तसेच सव्वासात कोटींचे भोजन कंत्राट रद्द केले जाणार आहे.

नागपूर उच्च न्यायालयातही भोजन कंत्राटाचे प्रकरण चालू आहे. न्यायालय या प्रकरणात काय आदेश देते, याची प्रतीक्षा अपर आयुक्त कार्यालयाला आहे.

तसेच नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्याची परवानगी द्यावी, अशी विनंती प्रशासन न्यायालयात करणार असल्याची माहिती आहे. अपर आयुक्त कार्यालयाने निविदा उघडून पुसद आदिवासी विकास प्रकल्पासाठी श्री स्वामी समर्थ सर्व्हिसेसला पात्र ठरवले होते. मात्र, यावर आक्षेप घेण्यात आला होता. त्यावेळी आक्षेप विचारात न घेतला गेल्याने एल-२ ठरलेल्या निविदाधारक संस्थेने नाशिक आयुक्त, आदिवासी विकास मंत्री आणि सचिवांकडे धाव घेतली होती. समर्थ संस्थेने नेर व वाशिम जिल्ह्यातील नवीन सोनखास येथील वसतिगृहाचे दोन अनुभव प्रमाणपत्र निविदेत जोडून शासनाची फसवणूक केल्याची बाब समोर आली होती

# वेतन व सेवासुरक्षा प्रश्नांवर मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन करण्याचा इशारा

## राज्यात अनुदानित शाळा ८, ९ जुलै रोजी बंद



विदर्भ प्रजासत्ताक
दि.५अमरावती

महाराष्ट्रातील अनुदानित व अंशतः अनुदानित शाळांच्या शिक्षकांनी शासनाच्या उदासीन धोरणांविरोधात आघाडी घेतलीअसून, येत्या ८ व ९ जुलै रोजी राज्यभरातील शाळा बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हजारो शिक्षकांनी मुंबईच्या आझाद मैदानावर धरणे आंदोलनाची तयारी सुरू केली आहे. शिक्षणहक्क कायद्याअंतर्गत शाळा सुरू ठेवण्याचे बंधन असतानाही शिक्षक संघटनांनी हा निर्णय घेतला आहे, हे या आंदोलनाचे गांभीर्य दर्शवते. वेतनातील तफावत, भरती प्रक्रिया ठप्प होणे, पदोन्नतीमध्ये अन्याय आणि नवीन अध्यादेशाची अंमलबजवणी न होणे याप्रमुख मागण्यांवर सरकारने दुर्लक्ष केल्यामुळे शिक्षक संतप्त झाले आहेत.

राज्यातील अनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांमधील शिक्षकांचे प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालले आहेत. शासनाने २०१२ नंतर शिक्षक भरती थांबवली असून, अनेक शिक्षकांच्या पदोन्नती रखडल्या आहेत. वेतन विसंगती, वेळेवर वेतन न मिळणे आणि सेवा अर्टीच्या अंमलबजावणीत सातत्याने चालढकल केली जात आहे. याविरोधात राज्यभरातील शिक्षक संघटनांनी एकत्र येत ८ आणि ९ जुलै रोजी राज्यव्यापी शाळा बंद आंदोलनाचे आवाहन केले आहे. मुंबईतील आझाद मैदान, जिथे १०,००० पेक्षा जास्त शिक्षक धरणे आंदोलनात सहभागी होणार आहेत.

### शाळा बंद ठेवण्यास शिक्षण संचालनालयाचा नकार

शाळा टप्पा वाढीसाठी पुरवणी मागणीत आर्थिक तरतूद न झाल्याने ८ व९ जुलै रोजी शाळा बंद ठेवाव्यात, अशी मागणी शिक्षण समन्वयक संघाने केली होती. मात्र, शिक्षण संचालनालयाने विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून ती फेटाळली आहे. संचालक डॉ. महेश पालकर यांनी स्पष्ट निर्देश दिले आहेत की, यादोन्ही दिवशी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा सुरूच राहतील. शाळा बंद ठेवू नये, यासाठी दक्षता घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### काय आहेत शिक्षकांच्या मागण्या

२०६२ नंतर थांबवलेली शिक्षक भरती तातडीने सुरू करावी, कारण अनेक शाळांमध्ये शिक्षकांच्या रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.शिक्षकांचे वेतन नियमितपणे अदा करावे व वेतनातील तफावत दूर करावी, जेणेकरून त्यांना आर्थिक अस्थिरतेचा सामना करावा लागणार नाही. शिक्षकांची पदोन्नती प्रक्रिया त्वरीत पूर्ण करावी, अन्यथा अनेक पात्र शिक्षकांवर अन्याय होत आहे.शालेय शिक्षण वि (बातीभागाचा नवीन अनुदानाचा जीआर तातडीने लागू करावा, यामुळे शाळांचे आर्थिक व्यवस्थापन अधिक स्थिर व प्रभावी होईल.

# डॉ. नितीन धांडे यांनी घेतली मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांची भेट

## शहरातील विविध समस्यांवर केली चर्चा



विदर्भ प्रजासत्ताक
दि.५अमरावती

अमरावती महानगरपालिकेच्या नवनियुक्त आयुक्त सौ. सौम्या शर्मा यांची भारतीय जनता पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष डॉ. नितीनजी धांडे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने सदिच्छा भेट घेऊन शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी माजी महापौर संजय नरवणे, माजी सभागृहनेता सुनिल काळे, माजी स्थायी समिती सभापती राधाताई कुरील, माजी समिती सभापती सचिन रासने, ललित समदुरकर, राजू कुरील हे उपस्थित होते.

शिष्टमंडळाने आयुक्तांशी अमरावती शहरातील विविध ज्वलंत समस्यांवर सविस्तर चर्चा केली. शहरातील दैनंदिन स्वच्छतेच्या अडचणी, करारनाम्यांमध्ये फॉगिंग व फवारणी व्यवस्था नसणे, कुत्र्यांचे वाढते प्रमाण, सीसीटीव्हीची गरज, तसेच महिला सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक पावले उचलण्याबाबत चर्चा झाली.शहरातील आरोग्य व्यवस्था सक्षम करण्यासाठी हेल्थ अँड वेलनेस सेंटर पूर्ण क्षमतेने सुरू करणे, औषधांचा नियमित पुरवठा, आणि दवाखान्यांमध्ये सुविधा उपलब्ध करून देण्याचे मुद्दे मांडण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधांसाठी शाळांमध्ये नवीन वर्ग खोल्यांचे बांधकाम, डिजिटल लॅब, शौचालय व सीसीटीव्हीची मागणी केली.तसेच भुयारी गटार योजना, ५० ई-बस लवकर मिळवण्यासाठी पाठपुरावा, महिला बचत गटांसाठी मॉलचे बांधकाम, आणि अमृत योजनेअंतर्गत २४७ पाणीपुरवठ्याची कार्यवाही यावर चर्चा झाली.

यावर आयुक्त सौ. शर्मा यांनी स्वच्छता व इतर कामांवर कार्य सुरू असल्याचे सांगून, उर्वरित विषयांवर लवकरात लवकर कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन दिले. तसेच सर्व प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी पालकमंत्री व महसूल मंत्री मा. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत लवकरच बैठक घेण्यात यावी, यासाठी शिष्टमंडळाने लेखी मागणी केली.

# गेल्या दहा दिवसांपासून पाऊस वादळाचा अंदाज देणारे रडारच बंद



विदर्भ प्रजासत्ताक
दि.५नागपूर

पावसाळ्यात वादळ आणि गारपिटीचा अंदाज 'डॉप्लर वेदर रडार' या यंत्रणेच्या माध्यमातून दिला जातो. मात्र, गेल्या दहा दिवसांपासून ही यंत्रणाच बंद पडलेली आहे. यापूर्वीही अनेकदा ही यंत्रणा बंद पडली आहे. त्यामुळे शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात कोट्यावधी रुपये खचून लावण्यात आलेली चिनी बनावटीची ही यंत्रणा पांढरा हत्ती तर ठरणार नाही ना, अशीही शक्यता व्यक्त केली जात आहे.

चिनी बनावटीची 'डॉप्लर वेदर रडार' ही यंत्रणा शहरात फेब्रुवारी २०११ मध्ये स्थापित करण्यात आली. मात्र, बदलत्या हवामानाचे आणि धोक्याचे संकेत देणारी ही यंत्रणा उद्घाटनानंतर अवघ्या काही दिवसातच बंद झाली. त्यावेळी देखभाल दुरुस्तीचे कंत्राट न दिल्याने वर्षभर ही यंत्रणा बंदच होती. तर आता कंत्राट देऊनही त्यात वारंवार बिघाड होत आहे. २०१४, २०१७ आणि २०१९ मध्ये ही यंत्रणा बंद झाली होती.

तर आता पुन्हा एकदा भर पावसाळ्यात ते बंद झाले आहे. २०१९ मध्ये मुंबई आणि नागपूर अशा दोन्ही ठिकाणी ही यंत्रणा एकाचवेळी बंद झाली. नागपुरात भर पावसाळ्यात एकाच महिन्यात दोनदा यंत्रणा बंद झाली. २०१४ साली ऐन गारपिटीच्यावेळी हे रडार बंद होते. २०१७ मध्येही अशीच परिस्थिती निर्माण झाली होती.मुंबईचे रडार पुण्यापर्यंत काम करते, पण नागपूरची यंत्रणा ही मध्यभारतातील एकमेव यंत्रणा असूनदेखील ती योग्यरित्या काम करत नाही, अशी स्थिती आहे. दरम्यान, यासंदर्भात प्रादेशिक हवामान खात्याकडे विचारणा केली असता तांत्रिक अडचणी येतच असतात. रडारमधील 'टेक्निकल बोर्ड' खराब झाला आहे आणि दिल्लीवरुन तो मागवण्यात आला आहे. त्यामुळे एक-दोन दिवसात यंत्रणा सुरळीत होईल, असे सांगण्यात आले.

# नवसारीतील क्रीडा संकुलाचे काम लवकर पूर्ण करा- आयुक्त शर्मा

## नागरिकांना दर्जेदार क्रीडा सुविधा देण्याचा उद्देश सफल व्हायलाच हवा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.५अमरावती



शहरातील नागरिकांना दर्जेदार क्रीडा सुविधा देण्याचा उद्देश सफल होण्यासाठी नवसारी येथील महापालिकेच्या क्रीडा संकुलाचे उर्वरित काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांनी शुक्रवारी मनपाच्या बांधकाम विभागाला दिले. तसेच कामात वेग आणण्याची सूचनाही त्यांनी यावेळी केली.

उत्तर झोनमधील नवसारी क्रीडा संकुल, खेळाचे मैदान, व्यावसायिक संकुल प्रकल्प व स्वच्छता स्थितीची मनपा आयुक्तांनी पाहणी केली. नवसारी सर्व्हे क्र. २९ येथील क्रीडा संकुल, खेळाचे मैदान, व्यावसायिक संकुल, नवसारी स्मशानभूमी कचरा स्पॉट, एकवीरा विद्युत कॉलनी, रिंगरोडवरील आराधना स्पॉट आणि रहाटगाव रोड परिसर या ठिकाणी भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांशी संवाद साधला. नवसारी सर्व्हे क्र. २९ येथे उभारण्यात येत असलेल्या खेळाचे मैदान, क्रीडा संकुल आणि व्यावसायिक संकुलाच्या प्रगतीचा आढावा घेतला. या प्रकल्पाच्या माध्यमातून कोणताही महापालिकेचा निधी न वापरता, 'बांधा-वापरा-हस्तांत रण' या तत्वावर प्रकल्प उभारण्यात येत असून, परिसरातील नागरिकांना दर्जेदार क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे.

हा प्रकल्प १६,७०८ चौ. मी. क्षेत्रफळावर उभारण्यात येत असून यात ५२.७० गुणिले ९२.५० मीटरचे फुटबॉल मैदान, बास्केटबॉल व बॅडमिंटन कोर्ट, प्रशासकीय इमारत, कॅफेटेरिया, क्लब हाऊस व व्यावसायिक संकुल यांचा समावेश आहे. स्वच्छ सर्वेक्षण २०२५ अंतर्गत १ ते ३१ जुलैदरम्यान 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' हे विशेष अभियान राबवण्यात येत असून, स्वच्छ आणि सुंदर अमरावतीसाठी नागरिकांनी एकत्र येणे अत्यावश्यक असल्याचे आयुक्तांनी सांगितले. या पाहणी वेळी अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त डॉ. मेघना वासनकर, सहायक संचालक नगर रचना घनश्याम वाघाडे, कार्यकारी अभियंता रवींद्र पवार, वैद्यकीय अधिकारी डॉ. अजय जाधव, सहायक आयुक्त नंदकिशोर तिखिले, भूषण पुसतकर, दीपक खडेकार, उपअभियंता आशिष अवसरे, स्वास्थ्य अधीक्षक श्रीकांत डवरे, अभियंता आनंद जोशी व मनपाचे इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. आयुक्तांनी नवसारी स्मशानभूमी परिसर, एकवीरा कॉलनी, रिंगरोडवरील आराधना स्पॉट व रहाटगाव रोड या ठिकाणी स्वच्छतेची पाहणी केली. या वेळी त्यांनी घनकचरा व्यवस्थापन, डस्टबिन वापर, सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य व्यवस्थापन यावर विशेष भर दिला. ज्या ठिकाणी डस्टबिन नाही किंवा कचरा टाकण्यास मनाई असूनही कचरा टाकला जात आहे, अशा ठिकाणी दंडात्मक कारवाई करावी. तसेच, नागरिकांनी देखील या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही मनपा आयुक्तांनी केले.

# अमरावती सह जिल्ह्यात ताडपत्री खरेदीला वेग; भाव स्थिर

## पावसापासून बचावासाठी ग्राहकांकडून खरेदी; विविध रंग, आकारांमध्ये बाजारात उपलब्ध

विदर्भ प्रजासत्ताक
दि.५अमरावती

अमरावती शहर व तालुक्यात सर्वत्र पावसाचे आगमन होताच मागील चार-पाच दिवसांपासून व्यावसायिक, शेतकरी व नागरिकांची ताडपत्री, प्लास्टिक पन्नी खरेदीसाठी बाजारात मोठी गर्दी होत आहे. घराच्या छतावर टाकण्यासाठी प्लास्टिक ताडपत्रीला मोठी मागणी आहे. विविध रंग व आकारात उपलब्ध असलेल्या प्लास्टिक ताडपत्रीचे भाव गतवर्षी प्रमाणेच स्थिर असल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

पावसाळ्याच्या दिवसांत आपल्या घरामध्ये पावसाचे पाणी जाऊ नये तसेच स्वतःचे साहित्य भिजून नुकसान होऊ नये यासाठी घरावर ताडपत्री टाकून ते संरक्षित केले जाते. या वेळी ताडपत्री विक्रेत्यांनी सांगितले की, पावसाळा सुरू झाला की आम्ही वेगवेगळ्या कंपनीच्या ताडपत्री विक्रीसाठी आणत असतो. सध्या ५० ते ७० रुपये मीटर व ३ रुपये २० पैसे चौरस फूट या भावाने तयार ताडपत्रीची विक्री होत आहे. झोपडपट्ट्यांमधील काही घरे विटा-मातीची असल्यामुळे दरवर्षीप्रमाणे घरे, जनावरांच्या गोठ्यांसाठी, खिडकी, लाकडी वस्तू आणि वाहन आदी ठिकाणी प्लास्टिक किंवा ताडपत्रीची गरज



असते.

गुजरात व इतर ठिकाणाहून ताडपत्री व प्लास्टिक साहित्यांची आयात केली जाते. शेंदरी, पिवळे, निळे, पांढरे, काळ्या अशा विविध रंगात उपलब्ध असलेल्या ताडपत्रीचे दर यंदा स्थिर आहेत. विविध आकारात व साइजमध्ये उपलब्ध असलेल्या ताडपत्री व प्लास्टिक कागदाची पावसाळ्यात अनेकांना गरज पडत असल्याने शहरातील जयस्तंभ चौक, गांधी चौकात खरेदीसाठी नागरिकांची गर्दी पाहायला मिळत आहे.

शेतीउपयोगी साहित्य खरेदीला प्राधान्य दर्यापूर तालुक्यात पावसाच्या हजेरीमुळे शेतकऱ्यांकडून खरीप हंगामाच्या पेरणीला वेग आला आहे. काही दिवसांपासून ग्रामीण भागातील नागरिकांची बाजारपेठेत विविध साहित्य खरेदीसाठी मोठी गर्दी होत आहे. शेतकरी बी-बियाणे, किटकनाशके, छत्री, प्लास्टिक कागद, पत्र्याची खरेदी करण्यास प्राधान्य देत असल्याचे चित्र जिल्ह्यातील बाजारपेठेत दिसत आहे.

# एकाच विकाणी पुन्हा-पुन्हा वृक्षारोपण, झाडे मरणावस्थेत : आदिवासी पर्यावरण सामाजिक संघटनेचा इशारा

विदर्भ प्रजासत्ताक
दि.५अचलपूर

तालुक्यात वनविभागाच्या वृक्षारोपण मोहिमेत गंभीर अनियमितता दिसून येत आहे. याबाबत आदिवासी पर्यावरण सामाजिक संघटना आणि स्थानिक वृक्षप्रेमींनी मागील दोन वर्षांपासून सातत्याने तक्रारी करीत वनविभागातील गैरप्रकार उघडकीस आणला आहे. तक्रारदारांनी म्हटले आहे की, वनविभाग केवळ कागदोपत्री आकडे वाढविण्यासाठीएकाच ठिकाणी वारंवार झाडे लावताहेत, ती मात्र जीवंत राहत





नाहीत. याबाबतची तक्रार झाली की, संबंधित अधिकारी तक्रारदारांनाच खोटे ठरविण्याचा प्रयत्न करतात.

सन २०२३-२४ मध्ये परतवाडा वनपरिक्षेत्रातील मौजा गोंडवाघोली व वाघडोह येथे वनविभागाने थाटामाटात १६ हजार झाडे लावली होती. परंतु काही महिन्यांतच ही सर्व झाडे मरून गेली. त्यानंतर एप्रिल २०२५ मध्ये त्याच ठिकाणी प्रखर उन्हात खड्डे करून झाडे लावण्यात आली, पण तीही पुन्हा जगली नाहीत.मार्डी (अमरावती) येथील रोपवाटिकेतून दोन ट्रक वृक्ष मागविण्यात आली आणि ३ जुलैपासून पुन्हा एकदा तिसऱ्यांदा त्याच जागेवर वृक्षारोपण सुरू करण्यात आले. ही संपूर्ण प्रक्रिया केवळ कागदोपत्री काम दाखवून निधी खर्च करण्यासाठी सुरू आहे, असे पर्यावरण कार्यकर्त्यांनी म्हटले आहे. या संपूर्ण प्रकारणाचा पाठपुरावा आदिवासी पर्यावरण सामाजिक संघटनेचे पदाधिकारी योगेश खानझोडे, सुरेश प्रजापती,प्यारेलाल प्रजापती, तसेच गोंडवाघोली गावचे वृक्षमित्र राजाराम कारले, संतोष भालेराव आणि फिरोज खान यांनी केला दोन वर्षांपासून सातत्याने शास दरबारी ते तक्रारी करत आहेत.

प्राण वायू देणाऱ्या रोपांचे रक्षकच जेव्हा भक्षक बनतात त्यावेळी कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. याप्रकरणामध्ये डीएफओ व वनपरिक्षेत्र अधिकारी यांची भूमिका पूर्णपणे संशयास्पद आहे. तक्रारकर्त्यांना खोटे ठरविण्यासाठी पुन्हा-पुन्हा एका ठिकाणी तीन वेळा रोप लावतात व ती नष्ट होत आहेत. याप्रकरणात कठोर कारवाई होईपर्यंत आम्ही शांत बसणार नाही.

**योगेश खानदोडे, अध्यक्ष,**
**आदिवासी पर्यावरण संघटना.**

### झाडे लावा, पण आधी जुनी झाडे वाचवा

या घोटाळ्याची तक्रार पालकमंत्री, विभागीय आयुक्त (अमरावती), पीसीसीएफ (नागपूर), जिल्हाधिकारी अमरावती, सीसीएफ अमरावती आणि डीएफओ अमरावती यांच्याकडे करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, आरएफओ आणि वनपाल यांना याबाबत खुलासा भागविण्यात आला आहे. तसेच झाडांचे नुकसान भरून काढण्यासाठी हे अधिकारी स्वखर्चाने ती भरपाई करतील, अशी माहिती समोर आली आहे.

# आदिवासी विद्यार्थ्यांची डॉक्टर्स, अभियंते होण्याच्या स्वप्नपूर्तीकडे गरूड झेप

## अमरावती अपर आयुक्त स्तरावर ३४ विद्यार्थी 'नीट', 'जेईई' उत्तीर्ण : नावीन्यपूर्ण उपक्रमाची मुहूर्तमेढ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

दऱ्याखोऱ्यात, वस्ती, वाड्यावर वास्तव्यास असलेल्या गरीब आदिवासी कुटुंबातील मुलांना डॉक्टर्स, अभियंते होता यावे, यासाठी आदिवासी विकास विभागाने नावीन्यपूर्ण योजनेंतर्गत 'नीट', 'जेईई' प्रवेशपूर्व परीक्षेकरिता प्रशिक्षण सुरू केले. या अभिनव उपक्रमाच्या माध्यमातून आदिवासी विद्यार्थ्यांची स्वप्नपूर्तीकडे वाटचाल सुरू झाली. यंदा २८ विद्यार्थी वैद्यकीय अभ्यासक्रम प्रवेशपूर्व परीक्षा (नीट) तर सहा विद्यार्थी जेईई उत्तीर्ण झाले. ज्या घरात शिक्षणाचा गंध नव्हता, अशा घरांची आदिवासी मुले येत्या काळात डॉक्टर, अभियंते होणार आहेत.




अमरावती एटीसी अधिनस्थ धारणी, अकोला, किनवट, छत्रपती संभाजीनगर, पुसद, कळमनुरी, पांढरकवडा या सातही एकात्मिक प्रकल्प कार्यालय अंतर्गत ८२ शासकीय आश्रमशाळांमधून इयत्ता दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी वैद्यकीय आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या परीक्षेची तयारी करण्यासाठी अनुक्रमे 'नीट' व 'जेईई'चे प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये यंदा ३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ते आता भविष्यात मेडिकल, अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे शिक्षण घेऊन करिअर करतील. नुकत्याच जाहीर झालेल्या निकालानुसार धारणी एकात्मिक प्रकल्प अधिकारी कार्यालय अधिनस्थ आश्रमशाळांतून १०, किनवट १३ तर पांढरकवडा ११ विद्यार्थी नीट, जेईईची परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त जितेंद्र चौधरी यांच्या मार्गदर्शनात धारणी प्रकल्प अधिकारी प्रियवंदा म्हादळकर, किनवट प्रकल्पाच्या तत्कालीन प्रकल्प अधिकारी नेहा भोसले, किनवटचे प्रकल्प अधिकारी डॉ. जेनीत दोनथुला यांनी नीट, जेईई प्रशिक्षण संदर्भात संदर्भात मोलाची कामगिरी बजावली.



आदिवासी विद्यार्थी कोणत्याही क्षेत्रात मागे राहू नये, यासाठी विविध उपक्रम, योजनांची मुहूर्तमेढ रोवली आहे. अमरावती एटीसी अंतर्गत राबविलेला नावीन्यपूर्ण उपक्रम स्तुत्य आहे. त्यामुळे यंदा ३४ आदिवासी विद्यार्थी नीट, जेईई उत्तीर्ण होऊन येत्या काळात डॉक्टर्स, अभियंते होतील. हा उपक्रम राज्यभर राबवू.

**– प्रा. अशोक उईके,**
**आदिवासी विकास मंत्री**

### नांदेड येथे मोफत कोचिंग क्लासेस

अकरावीत प्रवेशित आदिवासी विद्यार्थ्यांना नांदेड येथे नामांकित संस्थेत नीट, जेईई या परीक्षांच्या तयारीसाठी शिकवणी वर्ग लावण्यात आले. आयआयबीचे संचालक दशरथ पाटील यांनी गरीब व होतकरू आदिवासी विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण दिले. विद्यार्थ्यांना लागणारे शैक्षणिक साहित्य व कीट दिली. नीट प्रवेशपूर्व परीक्षेकरिता २२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, तर १५ विद्यार्थ्यांचा प्रवास सुरू झाला.

# शेगावचे मंदिर आज रात्रभर राहणार सुरु

## आषाढी एकादशी निमित्त विविध जिल्ह्यांतील हजारो भाविक श्रींच्या समाधी दर्शनासाठी दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५शेगाव**

आषाढी एकादशीच्या निमित्ताने जे भाविक श्री क्षेत्र पंढरपूर येथे जाऊ न शकले नाहीत ते भाविक विदर्भातील प्रति पंढरी म्हणून विख्यात असलेल्या श्री संत गजानन महाराज संस्थान शेगाव येथे दर्शन घेण्यासाठी येत असतात. भाविकांची गर्दी लक्षात घेता श्री संस्थानच्या वतीने शनिवार, ५ जुलै रोजी श्रींचे मंदिर रात्रभर खुले ठेवण्यात येणार आहे.

रविवार आषाढी एकादशी निमित्त, मराठवाडा, जळगाव खान्देश, विदर्भातील विविध



जिल्ह्यांतील हजारो भाविक श्रींच्या समाधी दर्शनासाठी येतात. यामुळे होणारी मोठी गर्दी, दर्शनासाठी लागणाऱ्या दीर्घ रांगा, भाविकांची गैरसोय लक्षात घेता हा निर्णय घेण्यात आला आहे.

आषाढी एकादशी निमित्त श्रींच्या मंदिरात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये काकडा भजन, दुपारी प्रवचन, सायंकाळी हरिपाठ व श्रींच्या पालखीची मंदिर परिक्रमा होणार आहे, रात्री ८ ते १० वाजेदरम्यान कीर्तन होणार आहे.

५ जुलैच्या रात्री आणि ६ जुलैला दिवसभर मंदिरांमध्ये जाऊन दर्शन घेता येईल. दर्शनबारी व श्रीमुख दर्शनबारी, महाप्रसाद, पारायण व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच भक्तांच्या सोयीसाठी संस्थानच्या भक्त निवासामध्ये नियमानुसार अल्पदरात राहण्याची व्यवस्था नित्याप्रमाणे सुरू आहे. भाविकांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी श्रींचे सेवेकरी आपली सेवा देण्यास तत्पर आहेत.

# विदर्भात १४ जुलै रोजी विदर्भातील सर्व बार बंद; बार मालकांचा सरकारला इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५ अमरावती**

दारूवरील वाढीव वॅट, १५ टक्के फी वाढ आणि दरवाढीच्या निषेधार्थ विदर्भातील बार मालकांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. विदर्भ बार असोसिएशनच्या नेतृत्वात अमरावती येथे आज बैठक पार पडली. बैठकीत १४ जुलै रोजी एक दिवसासाठी संपूर्ण विदर्भातील



६ हजारांहून अधिक बार बंद ठेवण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. यावेळी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा, धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. या एकदिवसीय बंदनंतरही सरकारने याकडे दुर्लक्ष केल्यास बेमुदत बार बंद आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी बैठक होऊनही कोणताही तोडगा न निघाल्याने बार व्यावसायिकांमध्ये असंतोष वाढला आहे. विदर्भातील बार व्यवसाय सरकारला दरवर्षी सुमारे ३ हजार कोटी रुपयांचा महसूल देतो. याशिवाय हजारो लोकांना रोजगार मिळतो. मात्र, सध्याच्या धोरणांमुळे बार चालक अडचणीत सापडले असून आता आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्याचा निर्धार त्यांनी केला आहे.

# तिकिटावरचा 'ट्रिप कोड' ॲपमध्ये टाका बस कुठून चाललीय ते मोबाइलवर बघा

## १५ ऑगस्टपासून मिळणार लोकेशन सुविधा प्रवाशांना लोकेशन ॲपची सुविधा

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या 'लालपरी' चे लोकेशन प्रवाशांना कळावे, यासाठी तयार केलेल्या ॲपची सुरुवात दि. १५ ऑगस्टला होणार आहे. या ॲपचा प्रवाशांना मोठा फायदा होणार असून, तिकिटावरचा ट्रीप कोड ॲपमध्ये टाकताच बस कुठून चाललीय ते मोबाइलवर बघता येणार आहे.

राज्य परिवहन महामंडळ दिवसेंदिवस हायटेक होत चालले आहे. प्रवाशांच्या दृष्टीने अनेक अत्याधुनिक उपायोजना करण्यात येत आहेत. प्रवाशांच्या सुविधेच्या दृष्टीने महत्त्वाची असलेली लोकेशन ॲप सुविधा दि. १५ ऑगस्टपासून सुरू होणार आहे. त्यामुळे ठराविक व लांबपल्ल्याच्या गावांचे लोकेशन प्रवाशांना पाहता येते. तिकिटावरील 'ट्रिप कोड' प्रवाशांसाठी महत्त्वाचा ठरणार आहे. हा कोड ॲपमध्ये टाकल्यानंतर बस नेमकी कुठे आहे.प्रवाशांनी काढलेल्या तिकिटावर एक ट्रिपल कोड देण्यात आलेला आहे. हा कोड ॲपमध्ये टाकल्यानंतर बसचे अचूक लोकेशन कळणार आहे.या लोकेशन ॲपच्या माध्यमातून प्रवाशांना केवळ बसचे लोकेशनच कळणार नाही, तर प्रवासादरम्यान किती थांबे देण्यात आलेले आहेत हेदेखील कळणार आहे.शिवाय इतर मार्गावरील बसची देखील वेळोवेळी माहिती मिळणार आहे. त्यामुळे लोकेशन ॲप सुविधा महत्त्वाची ठरणार आहे.



### कोणते ॲप इन्स्टॉल करावे लागणार ?

एसटी महामंडळाने 'एमएसआरटीसी लाइव्ह लोकेशन ॲप' नावाने हे अप्लिकेशन तयार केले असून, गुगल प्ले स्टोअरमधून डाऊनलोड केल्यानंतर प्रवाशांना या सुविधांचा लाभमिळणार आहे.

# धावत्या ऑटोमध्ये अल्पवयीन मुलीचा विनयभंग, अकोला शहरात खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अकोला**

शहरातील एका धक्कादायक घटनेमुळे मोठी खळबळ उडाली आहे. शहरात शिक्षणासाठी राहणाऱ्या बाहेर गावातील एका अल्पवयीन मुलीचा चालकाने धावत्या ऑटोमध्ये विनयभंग केला. अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न देखील ऑटो चालकाने केला. मात्र, मोठ्या हिंमतीने मुलीने स्वत:ची सुटका करून घेत थेट पोलीस ठाणे गाठले. पोलिसांनी तत्काळ ऑटो चालकाला गजाआड केले. जाफर खान सुभेदार खान (रा.नवेगाव, अकोला.) असे नराधम आरोपीचे नाव आहे.




अकोला शहरात बाहेर गावावरून विद्यार्थी शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणात येतात. परतवाडा येथील एक १६ वर्षीय विद्यार्थिनी नीटच्या शिकवणी वर्गासाठी शहरात भाड्याच्या खोलीत राहते. ती आजारी असल्याने परतवाडा येथे गेली होती. शुक्रवारी सायंकाळी बसने ती अकोल्यात परतली. बसस्थानकावरून आपल्या खोलीवर जाण्यासाठी ती एका ऑटोरिक्षामध्ये बसली. ऑटो बसस्थानकावरून निघाला. चालकाने ऑटो वेगळ्याच मार्गाने नेण्यास सुरुवात केली. अल्पवयीन मुलीला संशय आले. मुलीने प्रसंगावधान राखत आपल्या मित्राशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधला. मुलगी हा प्रकार सांगत असतांनाच ऑटो चालकाने मुलीचा हात पकडून स्वत:जवळ ओढले. मुलीचा विनयभंग केला. पीडित मुलीने प्रतिकार केला असता त्याने मुलीच्या डाव्या हातावर आणि हाताच्या दंडाला चावा घेतला. झटपट करून अल्पवयीन मुलीने स्वत:ची सुटका करून घेतली.

पीडित मुलीने थेट सिव्हिल लाईन पोलीस ठाणे गाठले. घडलेली माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य पाहता तातडीने ऑटो रिक्षा चालकाचा शोध घेतला आणि त्याला अटक केली. मुलीने ऑटोचा क्रमांक देखील दिला. त्यामुळे पोलिसांना ऑटो चालकाचा शोध घेण्यास मोठी मदत मिळाली. एमएच ३० ई ९४९७ या क्रमांकाचा ऑटो देखील पोलिसांनी ताब्यात घेतला. या प्रकरणी कलम ७४, ११८ (१), १३७ (२) बीएन सहकलम ८ पोक्सोनुसार जाफर खान सुभेदार खान याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी प्रहार आणि बजरंग दलाच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस ठाणे गाठून विनयभंग करणाऱ्या रिक्षा चालकावर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

# अमरावतीत लक्ष्मण हाकेंच्या वक्तव्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस आक्रमक

## पुतळ्याला चपला मारून निषेध, पोलिसांशी बाचाबाची : संतोष महात्मे यांच्या नेतृत्वात इर्विन चौकात आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्याविरोधात केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्यानंतर अमरावतीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. हाके यांच्या






वक्तव्याचा तीव्र निषेध व्यक्त करण्यासाठी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी अमरावतीत हाके यांच्या पुतळ्याला चपला मारून आंदोलन केले. यावेळी पोलिस आणि कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची झाल्याचे पहायला मिळाले.

लक्ष्मण हाके यांनी नुकत्याच घेतलेल्या पत्रकार परिषदेत अजित पवार यांच्यावर टीका करताना ओबीसी विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष आणि महाज्योतीला निधी न मिळाल्याचा आरोप केला होता. यासह त्यांनी अजित पवार यांच्याविरुद्ध आक्षेपार्ह भाषा वापरल्याने राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

# मोफत महाआरोग्य तपासणी शिबिरात ४११ रुग्णांच्या तपासण्या

## शिवसेनेचे प्रकाश मारोटकर यांनी राबविले आरोग्य शिबीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५नांदगाव खंडेश्वर**

जनसामान्याच्या हितासाठी त्यांच्या सुदृढ आरोग्यासाठी व रोगाचे योग्य निदान करण्यासाठी शिवसेनेचे ठाकरे गटाचे प्रकाश मारोटकर यांनी मोफत महाआरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन नांदगाव शहरातील बारी समाज भवन येथे डॉ. राजेंद्र गोडे वैद्यकीय रुग्णालयातील तज्ञ डॉ. यांनी ४११ रुग्णांच्या तपासण्या करून निशुल्क महाआरोग्य शिबीर पार पडले. शिबिराच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून आरोग्य तपासणी शिबिराला सुरुवात करण्यात आली यामध्ये डोळे तपासणी मोतीबिंदूचे ११० रुग्ण शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरले काही रुग्णांच्या शुगर, बी.पी. व हाडाचे दुखणे, हृदयरोग तपासणी, काना नाक घसा तपासणी, गरोदर स्त्रियांच्या तपासण्या, थायरॉईड तपासणी, दमा वातविकार तपासणी, अस्थीरोग तपासणी इत्यादी तपासण्या मोफत करून



मोतीबिंदू सह एकूण १९७ रुग्णांना पुढील तपासण्या व नंतर शस्त्रक्रिया औषधोपचार करिता डॉ.राजेंद्र गोडे रुग्णालय अमरावती येथे ७ जुलै रोजी मोफत नेण्यात येणार आहे या आरोग्य तपासणी शिबिरात ग्रामीण रुग्णालयातील RBSK व NCD विभाग सुद्धा उपस्थित होता यावेळी त्यांनी मोफत रक्त तपासणी केली या शिबिराचे आयोजन शिवसेना विधानसभा समन्वयक प्रकाश मारोटकर यांनी केले होते यावेळी बाळासाहेब राणे डॉ.विरेंद्र खापरी वासुदेव लोखंडे निलेश ईखार सुनील गुरमुळे भूषण दुधे चेतन डकरे रवी ठाकूर नितीन दुधे डॉ. अरुण बेलसरे रेखाताई नागोलकर छायाताई भारती शुभम रावेकर मनोज बनारसे निलेश डकरे अक्षय हिवराळे पवन शिरभाते महेंद्र डकरे सुनिल ईखार शुभम चांदणे राहुल शिवणकर प्रेम हिवराळे सूरज लोमटे इत्यादिंनी शिबिरासाठी परिश्रम घेतले.

नांदगाव शहरातील गोर-गरीब नागरिकांना आरोग्य तपासणी शिबिराच्या लावा सोबत शस्त्रक्रिया करून वयोवृद्ध ११० नागरिकांच्या मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया मोफत करणार असून ७ जुलै ला या रुग्णांना मोफत नेऊन पुढील तपासण्या व शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याचे शिबिराच्या आयोजक प्रकाश मारोटकर यांनी सांगितले

# १५ जुलैपासून फार्मर आयडी नसेल तर नाही मिळणार या योजनांचा लाभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.५अमरावती**

कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांच्या लाभासाठी ॲग्रीस्टक योजनेंतर्गत शेतकरी ओळख क्रमांक बंधनकारक करण्यात आले आहे. मदत व पुनर्वसन विभागानेही आता नुकसानभरपाईसाठी ओळख क्रमांक अनिवार्य केला आहे.

फार्मर आयडीमुळे शेतकऱ्यांची ओळख पटविणे आणि खऱ्या लाभार्थ्यांना लाभ देता येणे शक्य होणार असून, बनावटगिरीला आळा बसणार आहे. यामुळे राज्य सरकारच्या निधीची बचत होणार आहे. येत्या १५ जुलैपासून अर्थात खरीप हंगामात याची अंमलबजावणी होणार आहे. तर फार्मर आयडी तयार न करणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांपासून वंचित राहावे लागणार आहे.

ॲग्रीस्टॅक योजनेत राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच, शेतकऱ्यांच्या शेतातील हंगामी पिकांचा माहिती संच व शेतांचे भू संदर्भ यांचा एकत्रित माहिती संच तयार करण्यात येत आहे. तर महसूल अधिकार अभिलेखातील शेतकऱ्याची आणि शेताची माहिती घेऊन शेतकऱ्याचा आधारक्रमांक हा त्या माहितीशी जोडून प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या शेतांसह एकत्रितरित्या शेतकरी ओळख क्रमांक देण्यात येत आहे.